RNI. REG. NO. MAHBIL/2023/86118
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, नवी मुंबई, पुणे, रायगड, नाशिक, सातारा, कोल्हापूर

वर्ष ०३
अंक १६८
पृष्ठे ०८
रू. २/-

www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | ठाणे, दिनांक शनिवार, ११ ऑक्टोबर २०२५

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ
dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118 | 022 - 6971 1890



माझ्याशी लढायची ताकद नाही..म्हणून माझ्या आईला मध्ये आणत आहे...
पान ३ वर

विशेष लेख

भावनिक नात्याचं प्रतिक : करवा चौथ
पान ४ वर

**सुविचार**

"माझा धर्म सत्य आणि अंहिसेवर आधारीत आहे. सत्य माझा परमेश्वर आणि अंहिसा त्याला प्राप्त करण्याचे साधन."

- महात्मा गांधी

उर्दू साहित्य कला अकादमीचा सुवर्णमहोत्सवी तीन दिवसीय समारोह संपन्न
पान ८ वर



विशेष उपक्रम

वाचकांसाठी खास उपक्रम - ध्यास+ (ध्यास सकारात्मकतेचा)
पान ५ वर

ध्यास सकारात्मकतेचा

## थोडक्यात

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'प्रधानमंत्री धन–धान्य कृषी' योजनेचा शनिवारी शुभारंभ – कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई :** प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेबाबत केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये घोषणा करण्यात आली होती. या योजनेचा शुभारंभ ११ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी साडेदहा वाजता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भारतरत्न सी. सुब्रमण्यम सभागृह, पुसा, नवी दिल्ली येथे होणार आहे. महाराष्ट्र राज्यस्तरीय कार्यक्रम कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सभागृह पुणे या ठिकाणी होणार आहे. कृषी क्षेत्रात प्रयोगशील व प्रगतिशील कामगिरी करणारे ३०० हून अधिक शेतकरी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.या योजनमध्ये कमी उत्पादकता असलेले, कमी सिंचन क्षमता असलेले, कृषी कर्जाच्या उपलब्धतेबाबत समस्या असलेल्या १०० जिल्ह्यांची निवड केंद्र शासनाने केली आहे. यात महाराष्ट्र राज्यातील पालघर, रायगड, धुळे छत्रपती संभाजी नगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या नऊ जिल्ह्यांची निवड झालेली आहे.सद्य:स्थितीमध्ये राज्यामध्ये केंद्र व राज्य शासनाद्वारे कार्यान्वित असलेल्या ३६ हून अधिक केंद्रीय आणि राज्य योजनांच्या अभिसरणाद्वारे पिकांची उत्पादकता वाढवणे, पिक उत्पादनाची शाश्वतता सुनिश्चित करणे तसेच काढणीपश्चात तंत्रज्ञान व पतपुरवठा प्रणाली मजबूत करण्याच्या उद्देशाने देशातील १०० आकांक्षित जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे.

# जागतिक दर्जाचे 'कन्व्हेन्शन सेंटर' नागपुरात उभारण्यात येणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## स्पेन येथील फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसोबत सामंजस्य करार

**● मुंबई, विशाल पाटील :**



नागपुरात सर्व सोयी सुविधायुक्त जागतिक दर्जाचे 'कन्व्हेन्शन सेंटर' उभारण्यात येणार आहे. याबाबत स्पेन येथील फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसमवेत वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज सामंजस्य करार करण्यात आला. नागपूरला उभारण्यात येणारे 'कन्व्हेन्शन सेंटर' साठी निवडण्यात येणारी जागा सर्व परिवहन सेवांनी उत्तमरित्या जोडलेली असावी, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

यावेळी स्पेनचे भारतातील राजदूत जुआन अँटेनियो, फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रिकार्ड झेपाटेरो, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, पायोनियर एक्झिबिशन अँड कॉन्व्हेन्शन प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष मुकेश अरोरा आणि उपाध्यक्ष जीत अरोरा, नागपूर जिल्हाधिकारी विपिन इटनकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, नागपुरात प्रस्तावित असलेले कन्व्हेन्शन सेंटर केवळ प्रदर्शने, कार्यक्रम आदींसाठी उपयोगात येणारे नसावे, तर सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनासाठी हक्काचे व्यासपीठ असावे. नागपूरचा इतिहास 'कन्व्हेन्शन सेंटर' च्या माध्यमातून येथे आलेल्या प्रत्येकाला कळावा, अशा पद्धतीने कन्व्हेन्शन सेंटरची अंतर्गत रचना असावी. हे सेंटर अत्यंत आकर्षक, आधुनिक तंत्रज्ञानानेयुक्त आणि पर्यावरण पूरक वास्तूचे मूर्तिमंत उदाहरण ठरावे.

स्पेनचे राजदूत म्हणाले, भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि स्पेनचे प्रधानमंत्री पेड्रो सांचेझ यांच्यात चांगले संबंध आहेत. यामुळे दोन्ही देशातील द्विपक्षीय संबंध आणखी मजबूत होत आहे. भारत कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सामान्य नागरिकाच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणत असून याची दखल जगाने घेतली आहे. मुंबई हे भारताचेच नव्हे, तर दक्षिण आशियाचे 'पावर हाऊस' बनत आहे. त्यामुळे मुंबई राजधानी असलेल्या महाराष्ट्रसोबत नक्कीच स्पेनला काम करायला आवडेल, अशा शब्दात त्यांनी महाराष्ट्राचा गौरव केला.

पान २ वर

## 'एनएचएम' कर्मचाऱ्यांना १५ टक्के मानधन वाढ – आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**● मुंबई, सचिन कदम :**



राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना १५ टक्के इतकी मानधन वाढ देण्यात येणार आहे. याबाबत शासन मान्यता देण्यात आली असून, राज्यभरातील पन्नास हजार (५०,०००) कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून आनंद व्यक्त होत असून सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांचे कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागात विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन.एच.एम.) अंतर्गत विविध पदावर कंत्राटी तत्त्वावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांची मानधन वाढीची मागणी होती. त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासनाने १५ टक्के मानधन वाढ देण्याचा निर्णय केला आहे.आरोग्य यंत्रणा राबवण्यामध्ये एनएचएम कर्मचाऱ्यांचा महत्त्वाचा वाटा असून त्यांच्या उर्वरित मागण्यांबाबतही शासन सकारात्मक असल्याचे आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांनी सांगितले. १० वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणे, एनएचएम कर्मचाऱ्यांना इएसआयएस अंतर्गत सामाजिक सुरक्षा लाभ देणे, कर्मचाऱ्यांसाठी गंभीर आजार, अपंगत्व, मृत्यू अशा संकटात आर्थिक सहाय्य देण्यासाठी एनएचएम कर्मचारी कल्याण निधी उभारणे, अति दुर्गम व नक्षलग्रस्त भागात कार्यरत आरोग्य कर्मचाऱ्यांना विशेष भत्ता देणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनातील तफावत दूर करणे, यासह इतर मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून, याबाबत कार्यवाही सुरू आहे. या निर्णयामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढेल आणि आरोग्य विभागाची यंत्रणा अधिक परिणामकारक होईल, असा विश्वास आरोग्यमंत्री श्री.आबिटकर यांनी व्यक्त केला आहे.

सद्यस्थितीत राष्ट्रीय आरोग्य अभियानात कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. माहे जून २०२५ च्या देय मानधनावर मानधन वाढीची गणना करण्यात येणार आहे.

## ई-बस प्रवाशांसाठी आली खुशखबर; एसटीकडून मासिक व त्रैमासिक पास योजना

**● मुंबई, विशाल कारंडे :**




महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी महामंडळाने) प्रवाशांच्या सोयीसाठी आणि ई-बस सेवेला अधिक प्रतिसाद मिळवण्यासाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता राज्यातील ई-बस प्रवाशांना मासिक व त्रैमासिक पास सवलत योजना उपलब्ध होणार आहे.

अनेक प्रवाशांकडून ई-बस सेवेत पास प्रणालीची मागणी केली जात होती. या पार्श्वभूमीवर महामंडळाने प्रवाशांना अधिक सोयीस्कर आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारा प्रवास देण्यासाठी ही योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. ई-बस पास योजनांचा मुख्य उद्देश नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने दररोज एकाच मार्गावर

पान २ वर

## वॉर्डनिहाय बजेट वितरणात मोठी तफावत; प्रजा फाऊंडेशन आणि टाटा समाजविज्ञान संस्थेच्या अहवालातून उघड

**● मुंबई, राकेश गायकवाड :**




मुंबई महानगरपालिकेच्या गेल्या पाच वर्षांतील म्हणजेच २०२१ ते २०२५ या कालावधीत वॉर्डनिहाय बजेट वितरणात मोठी तफावत असल्याचे प्रजा फाऊंडेशन आणि टाटा समाजविज्ञान संस्था यांच्या संयुक्त अहवालातून स्पष्ट झाले आहे. 'मुंबईचे वॉर्डनिहाय बजेट' या अभ्यास अहवालाचे प्रकाशन गुरुवारी करण्यात आले. या अहवालात महसुली आणि भांडवली खर्चातील असमानता अधोरेखित करण्यात आली आहे.

गेल्या पाच वर्षांत पालिकेचे एकूण बजेट दुप्पट झाले आहे. २०२१-२२ मध्ये ३९,०२७ कोटी असलेले बजेट २०२५- २६ मध्ये ७४,३६७ कोटींवर गेले आहे. मात्र, याच काळात वॉर्डनिहाय बजेटचा वाटा १८ टक्क्यांवरून ११ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. वॉर्ड पातळीवरील गरजांकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून ही तफावत दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना गरजेची आहे, असे प्रजाचे मिलिंद म्हस्के यांनी सांगितले.

प्रजाने सादर केलेल्या अहवालानुसार मुंबईच्या पूर्व उपनगरांमध्ये दरडोई मालमत्ता कर कमी असूनही त्या भागात महसुली खर्चाचे प्रमाण दुप्पट आहे. या भागात प्रामुख्याने पर्जन्यवाहिन्या प्रकल्पांवर खर्च करण्यात आला आहे.

पान २ वर

# भारत-ब्रिटन भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आधार – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांचे संयुक्त निवेदन



**● मुंबई, दिगंबर जाधव :**

भारत आणि ब्रिटन वेगवेगळ्या क्षेत्रात नैसर्गिक भागीदार आहेत. या संबंधांना लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य यासारख्या मूल्यांवरचा परस्पर सामायिक विश्वास आहे. सध्याच्या जागतिक अस्थिरतेच्या काळात, भारत आणि ब्रिटन दरम्यानची ही वाढती भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आधार ठरली आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ झाले असून, व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि संरक्षण क्षेत्रात अभूतपूर्व संधी निर्माण झाल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले.ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर हे दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. मुंबईतील राजभवन येथे आज त्यांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा झाली. या चर्चेनंतर नरेंद्र मोदी व कीर स्टार्मर यांनी संयुक्त निवेदन जारी केले. त्यावेळी प्रधानमंत्री मोदी बोलत होते.

प्रधानमंत्री मोदी म्हणाले, यावर्षी जुलै महिन्यात माझ्या ब्रिटन दौऱ्यादरम्यान ऐतिहासिक सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करारावर (CETA) सहमती दर्शविली. या करारामुळे व्यापार आणि रोजगार निर्मिती वाढेल आणि ग्राहक तसेच उद्योग क्षेत्र दोघांनाही लाभ मिळेल. ब्रिटनचे पंतप्रधान आणि त्यांच्यासोबत आलेले आतापर्यंतचे सर्वात मोठे व्यावसायिक प्रतिनिधी मंडळ ही भागीदारीतील नव्या ऊर्जेचे द्योतक असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितले. दोन्ही देशांतील उद्योगक्षेत्रातील प्रतिनिधींची शिखर परिषद, सीईओ मंच आणि जागतिक फिनटेक महोत्सव यांच्या माध्यमातून सहकार्याच्या नव्या शक्यता समोर आल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्रधानमंत्री मोदी म्हणाले, आजच्या बैठकीत दोन्ही नेत्यांमध्ये इंडो-पॅसिफिक आणि पश्चिम आशियातील स्थैर्य, तसेच युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षावरही विचारांची देवाणघेवाण झाली. युक्रेन आणि गाझाच्या मुद्द्यावर भारत संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून शांतता पुनप्रस्थापित करण्यासाठीच्या सर्व प्रयत्नाचे समर्थन करतो.

पान २ वर

## ज्ञान हीच खरी संपत्ती – उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील



**● सातार, प्रथमेश चव्हाण :**

पैसा म्हणजे संपत्ती नाही तर ज्ञान ही संपत्ती आहे. जग खूप वेगाने पुढे चालले आहे. परंतू ते ज्ञान अद्ययावत असले पाहिजे. नवीन शैक्षणिक धोरण पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अंमलात आणले कारण ज्ञान हे बहुउद्देशिय असले पाहिजे, त्याचा कौशल्य विकास झाला पाहिजे. माणूस सर्वांगीण विकसित झाला पाहिजे, असे मत उच्च व तंत्रशिक्षण चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.पाटण येथील कोयना एज्युकेशन सोसायटी पाटण व्दारा बाळासाहेब देसाई महाविद्यालयातील आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र या नवीन अभ्यासक्रमांचा, अद्ययावत संगणक प्रयोगशाळेचा व नवीन विस्तारित इमारतीचा उद्घाटन मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते झाले.

पान २ वर

## संपादकीय

### हिमयुगाच्या दिशेने...

वस्तुतः पृथ्वी गरम होताना खडकांची झीज वेगाने होते. त्यामुळे जास्त कार्बन डाय डायऑक्साइड शोषले जाते आणि वातावरणातून ते बाहेर पडते. यामुळे पृथ्वी थंड होते. संशोधकांनी म्हटले आहे, की पृथ्वी गरम होताना खडक कार्बन जलद शोषून घेतात आणि पुन्हा थंड करतात. जुने भूगर्भीय पुरावे दर्शवतात की पृथ्वीचे सुरुवातीचे हिमयुग इतके तीव्र होते, की संपूर्ण ग्रह बर्फाने झाकलेला होते.संशोधकांना आढळून आले आहे की समुद्रातला कार्बनसंचयदेखील या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतो. वातावरणातील कार्बन डायऑक्साइड वाढत असताना आणि पृथ्वी गरम होत असताना फॉस्फरससारखे अधिक पोषक घटक समुद्रात जातात. पुढे उष्ण, पोषक तत्वांनी समृद्ध महासागरांमध्ये ऑक्सिजनची पातळी कमी होते. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे समुद्राच्या तळाशी जमा होण्याऐवजी फॉस्फरसचा समुद्रात पुनर्वापर केला जातो. त्यानंतर ही प्रक्रिया हळूहळू संतुलित होण्याऐवजी पृथ्वीला अत्यंत थंड होण्यास कारणीभूत ठरू शकते. या प्रक्रियेचे स्पष्टीकरण देताना संशोधक सांगतात की, तुम्ही आपल्या घरात एअर कंडिशनर (एसी) चालू करून तापमान २५ अंश सेल्सिअसवर ठेवू इच्छिता. बाहेरील तापमान वाढल्यास एसी अधिक थंडी निर्माण करतो. काही प्रकरणांमध्ये ही थंडी जास्त असू शकते. त्याचप्रमाणे पृथ्वीचा थर्मोस्टेंट कधी कधी जास्त थंडी निर्माण करतो. संशोधनात असेही आढळून आले आहे की प्राचीन काळात वातावरणातील ऑक्सिजनची पातळी खूपच कमी होती. त्यामुळे हे थर्मो स्टेंट आणखी अनियमित आणि अस्थिर बनले. म्हणूनच मागील हिमयुग इतके तीव्र होते. आज उच्च ऑक्सिजन पातळी बदलाचा परिणाम कमकुवत करेल; परंतु तरीही पुढील हिमयुगाच्या प्रारंभास काही प्रमाणात विलंब होऊ शकतो. याचा अर्थ असा आहे का, की मानववंशीय जागतिक तापमानवाढीनंतर पृथ्वी पुढील हिमयुगात प्रवेश करू शकतात. याबाबत संशोधकांचे म्हणणे हो असे आहे; परंतु ते लवकर होणार नाही. त्यांचे मॉडेल असे सूचित करते, की जास्तीत जास्त थंडी असा परिणाम नक्कीच निर्माण करेल; परंतु सध्याचे हवामानसंकट कमी करण्यासाठी हे पुरेसे नाही. संशोधनपत्रात म्हटले आहे, की पुढील हिमयुग पन्नास हजार वर्षांमध्ये सुरू होईल की दोन लाख वर्षांमध्ये हा खरा प्रश्न आहे. पृथ्वीचे नैसर्गिक थर्मोस्टेंट या आयुष्यात आपल्याला मदत करू शकत नाही.या संशोधनातून स्पष्ट होते की पृथ्वीवरील नैसर्गिक प्रक्रिया गुंतागुंतीच्या आहेत. जागतिक तापमानवाढीच्या सध्याच्या युगात आपल्या क्रियाकलापांवर आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण ठेवणे आपल्यासाठी अत्यावश्यक आहे. नैसर्गिक प्रणाली अखेरीस ग्रह थंड करतील; परंतु ही प्रक्रिया खूप मंद आहे आणि त्याचे परिणाम आपल्या आयुष्यात जाणवणार नाहीत. म्हणूनच सतत प्रयत्न आणि जागरूकता ही आजची सर्वात तातडीची गरज आहे. शास्त्रज्ञांचा विश्वास आहे की आपल्याला अजूनही आपल्या उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. हे खरे आहे की उष्ण झालेली पृथ्वी पुन्हा कधी तरी थंड होईल; परंतु ती इतकी मंद असेल की या पिढीला त्याचा काहीही उपयोग होणार नाही. म्हणून आपल्याला आजच कृती करण्याची गरज आहे, कार्बन उत्सर्जन कमी करणे, पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करणे आणि शाश्वत ऊर्जास्रोतांकडे वाटचाल करणे. जागतिक तापमानवाढ उलटवल्याने थेट हिमयुग सुरू होण्याची शक्यता नाही. त्याऐवजी, पृथ्वीचे नैसर्गिक चक्र आणि हरितगृह परिणाम पुढील हिमयुग सुरू होण्यास विलंब करू शकतात, जे पुढील दहा हजार ते एक लाख वर्षांमध्ये अपेक्षित आहे. काही सिद्धांत सूचित करतात, की जागतिक तापमानवाढ समुद्राच्या प्रवाहांना, विशेषतः गल्फ स्ट्रीमला विस्कळीत करून हिमयुग सुरू करू शकते. त्यामुळे युरोपमध्ये नाट्यमय थंडी पडते. कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन ताबडतोब थांबले, तरी सध्याच्या जागतिक तापमानवाढीचे आणि महासागरातील बदलांचे परिणाम पुढील हजार वर्षांमध्ये अपरिवर्तनीय असतील. आपल्या आयुष्यात हिमयुग सुरू होणे अशक्य होईल. १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला सलग अनेक वर्षी थंडी जास्त होती, तेव्हा काही शास्त्रज्ञांनी तापमानातील घट ही पृथ्वी एका नवीन हिमयुगात प्रवेश करत असल्याचे लक्षण आहे, असा अर्थ लावला; परंतु त्या दशकाच्या अखेरीस भाकिते उलटली आणि तज्ज्ञ वाढत्या तापमानाबद्दल काळजी करू लागले. तेव्हापासून सरकारे आणि पर्यावरणीय गट वातावरणातील हरितगृह वायू आणि जागतिक तापमानवाढ कमी करण्यासाठी सार्वजनिक ऊर्जेच्या वापरात नियम आणि बदल करण्यासाठी दबाव आणत आहेत. आपण आपल्या ऊर्जावापराच्या सवयी बदलण्याचा प्रयत्न करत असताना काही शास्त्रज्ञ प्रश्न विचारत आहेत, की जागतिक तापमानवाढ खरोखरच काही उद्देश पूर्ण करत आहे का? ही वाढती उष्णता आपल्याला दुसऱ्या हिमयुगात प्रवेश करण्यापासून रोखत आहे का आणि आपण ही प्रक्रिया उलट केली, तर पुन्हा एकदा बर्फाने झाकले जाऊ का? अतिथंडी आणि उष्णता पृथ्वीच्या इतिहासात नवी नाही. एक अब्ज वर्षांपासून पृथ्वीने उष्णता आणि थंडीच्या कालावधीत तापमानात आलटून पालटून मंद चढ-उतार अनुभवले आहेत. समुद्राचे प्रवाह, सूर्याभोवती पृथ्वीच्या कक्षेत बदल आणि वातावरणीय रचना यासह अनेक घटक याला जबाबदार आहेत. यापैकी काही कालखंड इतरांपेक्षा जास्त तीव्र होते. हिमयुग नावाच्या तीव्र शीतलहरीही येऊन गेल्या आहेत. त्या दरम्यान विशाल हिमनद्यांनी पृथ्वीचा बराचसा भाग व्यापला होता. हिमयुगांदरम्यान पृथ्वी सामान्यतः सापेक्ष उष्णतेच्या काळात प्रवेश करते, त्याला आंतरहिमयुग म्हणतात, जे आपण गेल्या बारा हजार वर्षांपूर्वीच्या हिमयुगाच्या समाप्तीपासून अनुभवत आहोत. आता दिसते की आपण तापमानवाढीच्या ट्रेंडमध्ये आहोत. अनेक शास्त्रज्ञांच्या मते तो पृथ्वीच्या वातावरणात उष्णता अडकवणाऱ्या हरितगृह वायूंचा परिणाम आहे. एका विचारसरणीच्या मते तापमानवाढ करणारा ग्रह म्हणजे असा ग्रह, जो हिमयुगात संपण्याची शक्यता कमी असते. पृथ्वी नेहमीच उष्ण आणि थंड चक्रातून जात असते. शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की पुढील दहा हजार ते एक लाख वर्षांमध्ये कधी तरी आपल्याला आणखी एका मोठ्या थंडीचा सामना करावा लागेल. असे झाले तर युरोप आणि उत्तर अमेरिकेसह जगाचा बराचसा भाग बर्फाच्या जाड चादीने झाकला जाईल. हिमयुग टाळणे ही चांगली बातमी वाटत असली तरी जागतिक तापमानवाढीचे पृथ्वीवर इतर गंभीर आणि अप्रिय परिणाम होऊ शकतात.

**- अनिकेत घनश्याम भंकाळ**

# महानायकाचा वाढदिवस

आज ११ ऑक्टोबर हिंदी चित्रपटसृष्टीचा शहेनशहा, महानायक अमिताभ बच्चन यांचा वाढदिवस. ११ ऑक्टोबर १९४२ रोजी उत्तरप्रदेशातील अलाहाबाद येथे जन्मलेल्या अमिताभ यांच्या वडिलांचे ( हरिवंशराय बच्चन ) मूळ आडनाव श्रीवास्तव असले तरी ते बच्चन या टोपणनावाने कविता प्रसिद्ध करीत त्यामुळे अमिताभ यांनीही चित्रपट सृष्टीत आल्यावर बच्चन हेच टोपणनाव आडनाव म्हणून वापरण्यास सुरवात केली. पुढे संपूर्ण कुटुंबाचेच बच्चन हेच आडनाव व्यवहारात रूढ झाले. अमिताभ बच्चन यांचे शालेय शिक्षण अलाहाबाद येथील ज्ञानप्रबोधिनी आणि बॉईज हायस्कूल येथे झाले. दिल्लीच्या किरोडीमल महाविद्यालयातून त्यांनी विज्ञानाची पदवी घेतली त्यानंतर काहीकाळ त्यांनी कोलकाता येथे एका कंपनीत काम केले पण तिथे त्यांचे मन रमले नाही तेथून ते मुंबईत आले आणि चित्रपटात कामाच्या संधी शोधू लागले. अमिताभ बच्चन यांना ख्वाजा अहमद अब्बास यांच्या सात हिंदुस्थानी या चित्रपटात संधी मिळाली. दुर्दैवाने हा चित्रपट चालला नाही. अमिताभ यांचाही म्हणावा तसा प्रभाव पडला नाही. अमिताभ बच्चन यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले तेंव्हा देव आनंद, शम्मी कपूर, राजेश खन्ना, विनोद खन्ना, जितेंद्र, धर्मेंद्र, शशी कपूर अशा देखण्या नायकाची चलती होती. अशा काळात अमिताभ तग धरतील का ? अशी साशंकता होती त्यात त्यांच्या पहिलाच चित्रपट जोरदार आपटला मात्र त्यांनी हार मानली नाही.सलग सात चित्रपट आपटूनही ते डगमगले नाही. १९७३ साली आलेल्या प्रकाश मेहरा दिग्दर्शित जंजीर या चित्रपटाने अमिताभ यांना खरा ब्रेक मिळवून दिला. या चित्रपटातील पोलीस इन्स्पेक्टरची त्यांची भूमिका खूप गाजली. या चित्रपटानंतर त्यांची अँग्री यंग मॅन अशी जनमानसात प्रतिमा निर्माण झाली. प्रचलित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंडखोरी व क्रोध व्यक्त करणाऱ्या युवकांचे प्रतिनिधित्व त्यांनी पडद्यावर साकारले त्यामुळेच त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना आपल्याशा वाटल्या. उंच शरीरयष्टी, भेदक डोळे, भारदस्त आवाज आणि अनोखी अभिनय शैली यामुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. ते लवकरच सुपरस्टार पदावर पोहचले. दिग्दर्शक ऋषिकेश मुखर्जी यांच्या आनंद चित्रपटात त्यांना सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यासमवेत काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे त्यांनी सोने केले. त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार त्यांना मिळाला. नमक हराम या चित्रपटातील त्यांची भूमिकाही लक्षवेधी ठरली. ७० आणि ८० चे दशक अमिताभ बच्चन यांनी अक्षरशः गाजवून सोडले. दिवार, शोले, अभिमान, कभी कभी, अमर अकबर अँथनी , मुक्कदर का सिकंदर, त्रिशूल, डॉन, काला पथर, नशीब, लावरीस, सिलसिला, नमक हलाल, कुली, शराबी, खुद्दार, अग्निपथ असे एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपट त्यांनी दिले. अमिताभ बच्चन यांच्या इतकी लोकप्रियता आजतागायत कोणत्याही अभिनेत्याला लाभलेली नाही. अमिताभ बच्चन हे त्यांच्या काळातील सर्वाधिक मानधन घेणारे अभिनेते होते. त्यांनी आजवर २०० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. त्यांनी काही चित्रपटात पार्श्वगायनही केले. मिस्टर नटवरलाल चित्रपटातील पार्श्वगायनासाठी त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कारही मिळाला होता. १९८४ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला मात्र हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणाला रामराम केला. १९८२ साली कुली चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी अपघात होऊनही करोडो चाहत्यांच्या आशीर्वादाने अमिताभ पुन्हा एकदा उभे राहिले. १९९६ साली अमिताभ बच्चन कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी त्यांनी स्थापन केली. मात्र लवकरच त्यांना ती बंद करावी लागली या दरम्यान त्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. हे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी त्यांनी दूरचित्रवाणीवरील कौन बनेगा करोडपती या मालिकेचे सूत्रसंचालन करण्यास सुरुवात केली. कौन बनेगा करोडपती ही प्रश्नमंजुषा देखील त्यानी यशस्वी केली. आज ते वयाची ८३ वर्ष पूर्ण करत असले तरी तरुणांना लाजवेल असा त्यांचा उत्साह आहे. अमिताभ बच्चन यांच्यासारखा प्रतिभावान कलाकार युगातून एकदाच जन्माला येतो. त्यांच्यासारखा अभिनेता भारतातच नव्हे तर जगात झाला नाही आणि पुढे देखील होणार नाही. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतानाच त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार**



## पान १ वरून...

### जागतिक दर्जाचे 'कन्व्हेन्शन सेंटर'...

फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रिकार्ड झेपाटेरो यांनी सादरीकरण केले. यावेळी जिल्हाधिकारी नागपूर आणि फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसोबत सामंजस्य कराराचे आदान प्रदान करण्यात आले.

### ई-बस प्रवाशांसाठी आली...

प्रवास करणाऱ्या नियमित प्रवाशांना ई-बस सेवेकडे आकर्षित करणे हा आहे. सध्या महामंडळाच्या ताफ्यात ई-बस प्रकल्पातील ४४८ बस आणि शिवाई प्रकल्पातील ५० ई-बसेस कार्यरत आहेत. भविष्यात या बसेसची संख्या आणखी वाढवण्याचा मानस आहे.

या मासिक व त्रैमासिक पास योजनेचा फायदा अनेक प्रवाशांना होणार आहे. तसेच प्रवासी संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

**पास योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये**

- ९ मीटर ई-बस, १२ मीटर ई-बस आणि ई-शिवाई सेवेमध्ये हे पासेस उपलब्ध असतील. (ई-शिवनेरी बससेवा वगळून)
- मासिक पास : (३० दिवस) : २० दिवसांच्या परतीच्या प्रवासाचे भाडे आकारून ३० दिवसांसाठी पास दिला जाईल.
- त्रैमासिक पास : (९० दिवस) : ६० दिवसांच्या परतीच्या प्रवासाचे भाडे आकारून ९० दिवसांचा पास उपलब्ध होईल.
- सेवा वर्गातील लवचिकता : उच्च सेवा वर्गाचा पास वापरून प्रवासी निमआराम किंवा साध्या बसमध्येही प्रवास करू शकतील.
- फरक भाडे नियम : निमआराम किंवा साध्या बसच्या पासधारकांना ई-बसने प्रवास करायचा असल्यास, भाड्यातील फरक १००% दराने भरून तिकीट घेऊन प्रवास करता येईल.

### वॉर्डनिहाय बजेट वितरणात मोठी...

दुसरीकडे, द्विपशहर भागात (आयलंड सिटी) केवळ २५ टक्के लोकसंख्या राहत असली तरी या भागावर सर्वाधिक दरडोई महसुली खर्च होत आहे, तर पश्चिम उपनगरांमध्ये, जेथे शहरातील ४४.४२ टक्के लोकसंख्या राहते, तेथे महसुली आणि भांडवली खर्च सर्वात कमी असल्याचे अहवालात म्हटले आहे.

टाटा समाजविज्ञान संस्थेच्या प्राध्यापिका डॉ. अमिता भिडे यांनी सांगितले की, या अहवालातून वॉर्डस्तरीय अर्थसंकल्पाचे वास्तव स्वरूप समोर आले आहे. अर्थसंकल्प ठरवताना लोकसंख्या आणि राहणीमान या घटकांकडे दुर्लक्ष का केले जाते, हा महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. वॉर्डनिहाय तसेच विभागनिहाय तफावत अत्यंत ठळक आहे.

प्रजा फाऊंडेशनचे संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त निताई मेहता यांनी स्पष्ट केले की, लोकसंख्या वाढ, पायाभूत गरजा आणि राहणीमानाचा विचार करून वॉर्डस्तरीय नियोजन करणे अत्यावश्यक आहे. बजेट प्रक्रिया अधिक सहभागी पद्धतीने होऊन नागरिकांचा व्यापक सहभाग वाढला पाहिजे. तेव्हाच नागरिकांच्या अपेक्षांचे प्रतिबिंब खऱ्या अर्थाने अर्थसंकल्पात दिसेल.

कार्यक्रमातील प्रमुख वक्ते, प्रजा फाऊंडेशनचे सल्लागार आणि माजी मुख्य सचिव सीताराम कुंटे म्हणाले की, या अभ्यासाचे निष्कर्ष मुंबई शहराचा कारभार अधिक सक्षम करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतील. धोरणकर्त्यांनी आणि अभ्यासकांनी अहवालातील मुद्द्यांचा गांभीर्याने विचार करून पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकसहभाग वाढवण्याच्या दिशेने काम करावे.

**वॉर्डस्तरीय कामांसाठी होणाऱ्या निधीत घट**

भांडवली खर्चाच्या वाट्याबाबतही अशीच घट दिसून आली आहे. २०२१-२२ मध्ये भांडवली खर्चाचे प्रमाण १० टक्के होते, तर २०२५-२६ मध्ये ते केवळ ३ टक्के इतके राहिले आहे. या आकड्यांवरून एकंदर शहरस्तरीय प्रकल्पांना जास्त निधी मिळत असला, तरी वॉर्डस्तरीय कामांसाठी होणारा निधी कमी झाल्याचे अहवालातून स्पष्ट होते.

### भारत-ब्रिटन भागीदारी जागतिक...

इंडो पॅसिफिक क्षेत्रात सागरी सुरक्षा विषयक सहकार्य वाढविण्यासाठी वचनबद्ध असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितले.

**भारत-ब्रिटन तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमातून नवोन्मेषाला चालना**

तंत्रज्ञान क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये अमर्याद सहकार्याची क्षमता असल्याचे सांगत प्रधानमंत्री मोदी म्हणाले, आम्ही ब्रिटनची औद्योगिक तज्ञता आणि संशोधन क्षमता भारताच्या प्रतिभा व व्याप्तीशी जोडत आहोत. गेल्या वर्षी सुरू केलेल्या भारत-ब्रिटन तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमातून नवोन्मेषाला चालना मिळत आहे. खनिज क्षेत्रातील सहयोगासाठी नवीन उद्योग संघ स्थापन केला जात असून त्याचा सॅटेलाईट कँपस आयएसएम धनबाद येथे असणार आहे, अशी माहितीही प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी दिली. शाश्वत विकासासाठी दोन्ही देशांनी भारत-युके ऑफशोअर विंड टास्कफोर्स आणि हवामान तंत्रज्ञान स्टार्टअप निधी स्थापन केल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री मोदी म्हणाले, ब्रिटनमधील नऊ विद्यापीठे भारतात त्यांचे कॅम्पस सुरू करत आहेत. साऊदम्टन विद्यापीठाच्या गुरूग्राम कॅम्पसचे उद्घाटन झाले असून, गिफ्ट सिटीमध्ये आणखी तीन विद्यापीठांच्या शाखा उभारल्या जात आहेत.

**भारत आणि युके यांच्यातील संरक्षण सहकार्य अधिक बळकट**

भारत आणि युके यांच्यातील संरक्षण सहकार्य अधिक बळकट होत असून, दोन्ही देश संयुक्त उत्पादनाच्या दिशेने पावले टाकत आहेत. याशिवाय, दोन्ही देशांच्या सैन्यदलांमध्ये सैन्य प्रशिक्षण सहकार्य करार झालेला असून, त्याअंतर्गत भारतीय वायुसेनेचे उड्डाण प्रशिक्षक आता युकेच्या रॉयल एअरफोर्समध्ये प्रशिक्षक म्हणून काम करणार आहेत. मुंबईत बैठक चालू असताना, आपल्या नौदलांची जहाजे 'कोंकण २०२५' हा संयुक्त सराव करत आहेत. हा आमच्या मजबूत सामरिक सहकार्याचा पुरावा असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी नमूद केले.

युकेमध्ये वास्तव्यास असलेले १८ लाख भारतीय हे दोन्ही देशांमधील मैत्रीचे जिवंत उदाहरण आहे. त्यांनी ब्रिटिश समाज आणि अर्थव्यवस्थेत दिलेले योगदान अत्यंत मोलाचे असून दोन्ही देशांतील मैत्री आणि विकासाच्या पुलाला बळकटी दिली आहे, असेही प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितले.

भारताची गतिशीलता आणि युकेची तज्ञता मिळून एक अद्वितीय सुसंवाद निर्माण होतो. आमची भागीदारी प्रतिभा, तंत्रज्ञान आणि विश्वासावर उभी आहे. आम्ही दोन्ही देशांच्या लोकांसाठी उज्ज्वल भविष्य घडवू, असा विश्वास प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी व्यक्त केला.

भारत-युके भागीदारीचा नवा अध्याय : मानवी नात्यांचा सेतू अधिक मजबूत करण्याची वचनबद्धता – ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर

भारत आणि ब्रिटन यांच्यातील मानवी बंध हेच या नात्याचे खरे वैशिष्ट्य आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितल्याप्रमाणे, हे दोन देशांदरम्यानचे, लोकांदरम्यानचा, मनांदरम्यानचा जिवंत पूल आहे, असे ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी आज मुंबईत आयोजित द्विपक्षीय बैठकीनंतर जारी केलेल्या संयुक्त निवेदनादरम्यान सांगितले.

कीर स्टार्मर म्हणाले, भारत-युके एकत्र येऊन आधुनिक आणि भविष्याभिमुख भागीदारी निर्माण करत आहेत. यामुळे दोन्ही देशांच्या नागरिकांसाठी नव्या संधी निर्माण होतील. युके-भारत सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार (CETA) पूर्ण करणे हा ऐतिहासिक टप्पा आहे. या करारामुळे आयात शुल्क कमी होईल, बाजारपेठांमध्ये अधिक प्रवेश मिळेल, रोजगारनिर्मिती होईल आणि दोन्ही देशांतील जनतेचे जीवनमान उंचावणार आहे. कराराच्या आर्थिक लाभांपलीकडे जाऊन, या प्रक्रियेत निर्माण झालेला आत्मविश्वास आणि परस्पर सहकार्याचा भाव हे भारत-युके संबंध अधिक दृढ करत असल्याचेही कीर स्टार्मर यांनी नमूद केले.

ही बैठक भारताची आर्थिक राजधानी मुंबईत होत आहे, हे प्रतीकात्मक आहे. भारताची आर्थिक प्रगती विलक्षण आहे. २०२८ पर्यंत जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याचे उद्दिष्ट आणि 'विकसित भारत २०४७' या दृष्टिकोनाबद्दल मी प्रधानमंत्री मोदी यांचे अभिनंदन करतो. या प्रवासात आम्ही भारताचे भागीदार व्हावे, ही आमची इच्छा आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या भेटीदरम्यान भारत-युके व्यापार कराराच्या संधींना वास्तवात आणण्यासाठी ब्रिटनकडून १२६ कंपन्यांचे सर्वात मोठे व्यावसायिक प्रतिनिधीमंडळ भारतात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

कीर स्टार्मर म्हणाले, युके आणि भारत हे तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रातील आघाडीचे देश आहेत. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रगत संवाद व्यवस्था, संरक्षण तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्य अधिक मजबूत करण्याचा आमचा संकल्प आहे.

बॉलीवूड चित्रपटांचे चित्रीकरण युकेमध्ये करण्यासाठी करार जाहीर करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. शिक्षण क्षेत्रात भागीदारी वाढवण्याच्या दृष्टीने सर्व ब्रिटिश विद्यापीठे भारतामध्ये आपले कॅम्पस सुरू करणार असल्याची घोषणा त्यांनी केली. यामुळे ब्रिटन भारताचा अग्रगण्य आंतरराष्ट्रीय शिक्षण भागीदार बनेल आणि व्हिजन २०३५ ला मूर्त रूप मिळेल, असेही ते म्हणाले.

### ज्ञान हीच खरी संपत्ती...

याप्रसंगी आमदार डॉ. अतुल भोसले, सत्यजितसिंह पाटणकर, अमित कुलकर्णी अमरसिंह पाटणकर, याज्ञसेन पाटणकर, हिंदूराव पाटील, राजाभाऊ शेलार आदी उपस्थित होते.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. पाटील म्हणाले, माणसाने स्पर्धा करावी ती स्पर्धा ज्ञानाशी असावी. स्टार्टअप इंडियामध्ये जगभरात आपण पोहचलो आहोत. भारताकडे बुद्धीमत्ता आहे फक्त आधाराची गरज असते. जगाभरातील अनेक कार्पोरेट कंपन्यांचे सीईओ भारतीय आहे, असेही मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले.आमदार डॉ. भोसले म्हणाले, आठ लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या मुलींना मोफत शिक्षण देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यात वस्तीगृहांना मोठ्या प्रमाणात मदत दिली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.प्रास्ताविक संजीव चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दीपक डांगे यांनी तर आभार एस डी पवार यांनी मानले.

Printed, Published and Owned by Rakesh Shankar Gore and Printed at Somani Printing Press, Unit no.04, Ground Floor, N.K. Industrial Estate, off. Aarey Road, near Pravasi Ind. Estate, Gate no.2, Goregaon (east) Mumbai-400063, and Published at Shop no. 12, B-2, Sai Dham Shopping Center, Mangal Nagar,15 No. Last Bus Stop, Near G.C.C. Club, Mira Road (east), Dist: Thane-401107, Maharashtra. Editor-Rakesh Shankar Gore. RNI REG. No: MAHBIL/2023/86118. Office Contact no. 9702386118, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Website: www.lokrakshanay.com (ठाणे न्याय कक्षेत)

# माझ्याशी लढायची ताकद नाही.. म्हणून माझ्या आईला मध्ये आणत आहे – आमदार रोहित पवार भाजपावर संतापले

**नवी मुंबई (भावना जैन) :** माझी आई राजकारणात नाही. समाजकारणात आहे. भाजप आज राजकारण करताना कोणत्या थराला जात आहे. आईला यातलं काहीही कळत नाही. माझ्या आईबद्दल विरोधक किंवा आमच्या सोबतच्या लोकांना जरी विचारलं तरी, अतिशय साध्या सरळ स्वभावाच्या त्या आहेत असे सांगतील. आई राजकारण नाही फक्त समाजकारण करते. तिच्या बाजूला कोणी विरोधक येऊन उभा राहिला तरी तिच्या लक्षात येणार नाही. मात्र निलेश घायवळ समवेतचा माझ्या आईचा फोटो वापरून भाजप असे गलिच्छ राजकारण करत असेल तर त्याचा अर्थ असा निघतो कि, भाजपा मला समोर जायला घाबरत



आहे. अशी टीका रोहित पवार यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना केली आहे. नवी मुंबईतील एका कार्यक्रम प्रसंगी ते उपस्थित होते.

पुण्यातील कुख्यात गुंड निलेश घायवळ प्रकरण चांगलेच तापले असून यात सर्वच नेत्यांनी उडी घेतली आहे. अशातच भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसचे(शरद पवार) आमदार रोहित पवार यांच्या आईचा एका कार्यक्रमातील निलेश घायवळ समवेतचा फोटो समाजमाध्यमांवर टाकून रोहित पवार यांना लक्ष्य करण्यात आले होते. यावर प्रत्तुत्तर देतांना रोहित पवारांनी भाजपला थेट आव्हान दिलं आहे. आईला कशाला मध्ये आणता? तुमच्यात ताकद नाही का माझ्याशी लढायची? मी राजकारणात आहे. तुम्हाला काय काढायचं ते काढा, आम्हाला जे काय काढायचं ते काढू, असेही रोहित पवार म्हणाले.

निलेश घायवळला योगेश कदम यांनी बंदुकीचे लायसन्स कुणाच्या सांगण्यावरून दिले हे शिवसेना नेते रामदास कदम यांनीच स्पष्ट केले आहे. मी आधीच बोललो होतो सभापती राम शिंदे यांच्या सांगण्यावरून लायसन्स दिले आहे. त्याला रामदास कदम यांनी दुजोरा दिला आहे. मात्र यावरून भाजपच्या पोटात दुखायचं कारण काय आहे. असा प्रश्नही रोहित पवारांनी यावेळी उपस्थित केला.

गोव्यातील विमानतळाला स्व.मनोहर पर्रीकर यांचे नाव देण्यात आले होते. हा निर्णय स्वागतार्ह होता. मात्र याच पद्धतीने भूमिपुत्रांच्या विकासासाठी काम करणारे दिवंगत नेते दि.बा.पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यास काय हरकत आहे. मात्र भाजपा तसे करण्यास तयार नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला नुकतीच शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र सद्य परिस्थितीत भाजप आणि संघाचे काही चांगले सुरू आहेत असे चित्र दिसत नाही. यामुळे संघाला खुश करण्यासाठी संघाच्या एखाद्या बड्या नेत्याचे नाव विमानतळाला देण्याच्या तयारीत भाजपा असू शकते.

अथवा पालिका निवडणुकीच्या तोंडावर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देऊ अशी केवळ घोषणा करण्यात येईल आणि निवडणुका लढवण्यात येतील. मात्र प्रत्यक्षात निवडणुका पार पडल्या नंतर ते नाव बदलून दुसरे नाव दिले जाईल, असेही रोहित पवार यावेळी म्हणाले.

## नंदीबैल मालक व्हॉट्सपमध्ये दंग, नंदीबैल चर्वणात दंग

**डोंबिवली (सम्यक कासारे) :** पाऊस ओसरला की राज्याच्या विविध भागातील नंदीबैल मालक ऑक्टोबरमध्ये कोकण पट्ट्यात नंदीबैल घेऊन मनोरंजनासाठी निघतात. आठ महिने म्हणजे पाऊस पडेपर्यंत नंदीबैल मालकांचा नंदीबैलासह कोकण पट्टीत मुक्काम असतो. गावोगावी, शहरांच्या विविध भागात जाऊन नंदीबैलाच्या माध्यमातून मनोरंजनाचे खेळ करून नंदीबैलाच्या माध्यमातून काही कुटुंबे उपजीविका करतात. आता नंदीबैल मालक मनोरंजनाच्या ठिकाणी गेल्यावर व्हॉट्सपमध्ये दंग असल्याचे आणि नंदीबैल चर्वण करत उभे असल्याचे चित्र दिसत आहे.

व्हॉट्सपमध्ये दंग आणि गुंगीमुळे प्रत्येक नागरिक व्यस्त झाला आहे. त्याचप्रमाणे नंदीबैल मालकही सकाळी आठ वाजता नंदीबैल घेऊन आपल्या राहुटीतून बाहेर पडला की गाव, शहरातील मोकळ्या मैदानात जाऊन नंदीबैल आल्याची आरोळी ठोकत आहेत. जवळील



ढोलके जोरजोराने विशिष्ट लयीत वाजवून नागरिकांना नंदीबैलाची दर्शन घेण्यासाठी पाचारण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

पण, नोकरी, व्यवसाय, शाळा अशा अनेक धबडग्यात व्यस्त असलेला नागरिक आणि नंदीबैलाचे विशेष आकर्षण असणारी शाळकरी मुले आता शाळा, खासगी शिकवणी आणि क्रीडा, गायन, नृत्य अशा सगळ्या प्रकारांमध्ये व्यस्त राहत असल्याने नंदबैलाचे नागरिक, मुलांकडून उत्सुकतेने यापूर्वीसारखे स्वागत होत नाही. आपल्या घराच्या दारात आलेला नंदीबैल आता 'एकाकी' पडला आहे.

## डोंबिवलीत घनश्याम गुप्ते रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे भाजप नगरसेवक दाम्पत्याचा उपोषणाचा इशारा

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** डोंबिवली पश्चिमेतील रेल्वे स्थानकाजवळील सर्वाधिक वर्दळीचा आणि बाजारपेठेचा भाग असलेल्या घनश्याम गुप्ते या खराब झालेल्या, खड्डे पडलेल्या रस्त्याचे डांबरीकरण, सुस्थितीकरण येत्या आठवडाभरात केले नाहीतर दिवाळीच्या दिवशी, म्हणजे १८ ऑक्टोबर रोजी आम्ही नागरिकांच्या पुढाकाराने विष्णुनगर मासळी बाजार येथे एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करणार आहोत, असा इशारा भाजपच्या माजी नगरसेविका मनीषा धात्रक आणि माजी नगरसेवक शैलैश धात्रक यांनी कल्याण डोंबिवली पालिका शहर अभियंता अनिता परदेशी यांना दिला आहे.

पालिकेत शिवसेना-भाजपचे वर्चस्व आहे. भाजप नेते, लोकप्रतिनिधींचा पालिका प्रशासनवर वचक आहे. अशाही परिस्थितीत भाजप नगरेसवकांना खड्डे पडलेल्या घनश्याम गुप्ते रस्त्यासाठी उपोषण करावे लागत असल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त केल जात आहे.

डोंबिवली पश्चिमेतील रेल्वे स्थानकाजवळील



घनश्याम गुप्ते रस्ता हा सर्वाधिक वर्दळीचा रस्ता आहे. डोंबिवली पश्चिम रेल्वे स्थानकाचे हे प्रवेशद्वार आहे. शहराच्या विविध भागातील नागरिक पायी, रिक्षा, खासगी वाहनाने या रस्त्यावरून जातो. गुप्ते रस्ता हा बाजारपेठेचा भाग आहे. गेल्या दोन वर्षापासून घनश्याम गुप्ते रस्त्याची चाळण झाली आहे. हा रस्ता प्राधान्याने सीमेंट काँक्रिटीकरणाचा करणे आवश्यक असताना शहरांतर्गत गल्लीबोळातील रस्ते काँक्रीटचे केले जात आहेत. या रस्त्याला उपेक्षितेची वागणूक दिली जात आहे. हे या भागातील नागरिक, व्यापाऱ्यांवर अन्यायकारक आहे, असे भाजप माजी नगरसेवक शैलैश धात्रक यांनी सांगितले.

**नंदीबैल मालक व्हॉट्सपमध्ये दंग, नंदीबैल चर्वणात दंग**

मागील पाच महिन्याच्या काळात मुसळधार पावसाने या रस्त्याची खड्ड्यांमुळे चाळण झाली आहे. खड्ड्यांमुळे या रस्त्यावरून वाहने संथगतीने धावतात. सकाळ, संध्याकाळ या रस्त्यावर वाहन कोंडी असते. गुप्ते रस्ता खराब झाला आहे हे माहिती असुनही या रस्त्यावरील खड्डे भरणी, रस्ते सुस्थितीकरण केले जात नसल्याने पालिका प्रशासनाचा निषेध करण्यासाठी आम्ही दिवाळी सणात लाक्षणिक उपोषणाला बसणार आहोत, असे माजी नगरसेविका मनीषा धात्रक यांनी सांगितले.

रेल्वे स्थानक ते घनश्याम गुप्ते चौक दरम्यान हा रस्ता सुस्थितीत होणे आवश्यक आहे. हा रस्ता काँक्रीटचा होणार आहे असा विचार करून प्रशासन या महत्वपूर्ण विषयाकडे लक्ष देत नाही. पालिकेने काही रस्ते एमएमआरडीएकडे काँक्रिटीकरण कामासाठी हस्तांतरित केले आहेत.

## पालघरमध्ये वीजचोरांवर महावितरणची 'करडी नजर'; ५ महिन्यांत ५३ लाखांचा दंड आकारला

**पालघर (सतीश सोनावणे) :** वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांवर महावितरणने पालघर जिल्ह्यात धडक कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली आहे. आकडा टाकून किंवा मीटरमध्ये छेडछाड करून धोकादायक मार्गाने वीज चोरणाऱ्या तब्बल ३११ ग्राहकांना गेल्या पाच महिन्यांत रंगेहाथ पकडण्यात आले आहे. एप्रिल २०२५ ते ऑगस्ट २०२५ या पाच महिन्यांच्या काळात या ग्राहकांकडून ५३.३६ लाख रुपयांचे वीज देयक (दंड) आकारण्यात आले आहे.

पालघर जिल्ह्यातील बोईसर ग्रामीण, डहाणू, जव्हार, पालघर, सफाळा, तलासरी आणि विक्रमगड या भागांमध्ये



वीज चोरीची सर्वाधिक प्रकरणे उघडकीस आली आहेत. महावितरणने कारवाई केलेल्या ३११ वीजचोरांना एकूण ५३.३६ लाख रुपयांचे देयक (दंड) देण्यात आले आहे. यापैकी १५२ ग्राहकांनी सुमारे ३६.२७ लाख रुपये दंड भरला आहे. उर्वरित १८२ ग्राहकांनी अद्याप दंड आणि वीज बिल भरलेले नाही.

या ग्राहकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येऊ शकतो असे देखील महावितरण ने सांगितले आहे त्यामुळे या ग्राहकांनी लवकरात लवकर विज बिल भरणे आवश्यक आहे.

जे ग्राहक दंड भरण्यास टाळाटाळ करत आहेत, त्यांच्यावर महावितरणच्या फिर्यादीनुसार कायदेशीर कारवाईची प्रक्रिया जलदगतीने सुरू झाली आहे. महावितरणने पालघर जिल्ह्यातील जवळपास चार लाख वीज ग्राहकांना सुरक्षित आणि सुरळीत विद्युतपुरवठा देण्यासाठी वीज चोरीविरोधातील ही धडक मोहीम यापुढेही सुरूच राहील, असे स्पष्ट केले आहे. नागरिकांनी अनधिकृत वीज वापर टाळून अधिकृत मीटरद्वारेच विजेचा वापर करावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

यासह दंड न भरणाऱ्यांवर कठोर फौजदारी कारवाई केली जाईल व ग्राहकांनी ही कटू कारवाई टाळण्यासाठी त्वरित थकीत देयके भरावीत असे आवाहन करण्यात आले.

**वीज चोरीचे धोकादायक प्रकार**

वीजबिल कमी करण्याच्या लोभापायी काही ग्राहक मुख्य वाहिनीवर थेट आकडा टाकून किंवा विद्युत मीटरमध्ये 'इलेक्ट्रिकल रेझिस्टर' (विद्युत विरोधक) टाकून वीज प्रवाह कमी करतात. महावितरणने सुरू केलेल्या शोध मोहिमेत अभियांत्रिकी पथकाद्वारे तसेच फिरत्या पथकाद्वारे या चोऱ्या उघडकीस आणल्या जात आहेत.

## जलपर्णीच्या पर्यावरणपूरक पुनर्वापराचा नवा पर्याय !, दिवाळीच्या मुहूर्तवार परडीना उत्तम मागणी

**ठाणे (विशाल कारंडे) :** नैसर्गिक जलस्रोतांना विळखा देणारी वनस्पती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जलपर्णी पासून विविध शोभेच्या आणि दैनंदिन वापरातील वस्तू तयार करण्याचा प्रकल्प जिल्हा परिषदेच्या माध्यमातून काही महिन्यांपूर्वी सुरु करण्यात आला होता. या प्रकल्पातून परड्या, फाईल फोल्डर, योगा मॅट, लॅपटॉप बॅग, डायनिंग टेबल मॅट यांसह भेट स्वरूपात देता येतील अशा वस्तू तयार करण्यात येत आहेत. तर दिवाळीच्या मुहूर्तावर या वस्तूंची मागणी चांगलीच वाढली असून मिठाई, फळे आणि इतर भेटवस्तू देण्यासाठी परड्या तसेच इतर शोभेच्या वस्तू यांची बाजारात चांगली मागणी आहे. यामुळे यंदाची दिवाळी जलपर्णी पासून विविध वस्तू तयार करणाऱ्या महिला बचत गटांसाठी आर्थिकदृष्ट्या उत्तम ठरत आहे.जलपर्णी ही जलस्रोतांवर तरंगणारी हिरव्या रंगाची सुंदर दिसणारी पण अतिशय घातक वनस्पती आहे. शोभेच्या उद्देशाने भारतात आणल्यानंतर ती वेगाने पसरली आणि आता देशातील जवळपास सर्वच नद्यां, तलावांमध्ये आढळते. ही वनस्पती काही दिवसांतच दुप्पट



वाढते आणि पाण्याच्या पृष्ठभागावर दाट हिरवा थर तयार करते. या थरामुळे पाण्यातील सूर्यप्रकाश खाली पोहचत नाही, त्यामुळे प्रकाशसंश्लेषणाची प्रक्रिया अडते आणि पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण घटते.परिणामी मासे आणि इतर जलचर प्राणी मरू लागतात. जलपर्णी सडल्यावर जलाशयाच्या तळाशी गाळ वाढतो, पाण्याची साठवण क्षमता कमी होते आणि जलाशय हळूहळू भरून जातात. तसेच या स्थिर पाण्यात डासांची उत्पत्ती वाढते, ज्यामुळे डेंग्यू, मलेरिया सारख्या आजारांचा धोका निर्माण होतो.

## कल्याण, कांजुरमार्ग ते बदलापूर मेट्रो मार्गांना गती द्या, नगरविकास विभागाचे 'एमएमआरडीए'ला पत्र

**कल्याण (गणेश बागडे) :** बदलापूर शहर परिसरातील नागरीकरणाचा वाढता वेग विचारात घेऊन बदलापूर शहर परिसर मुंबईत कांजुरमार्ग, कल्याण परिसरातून मेट्रो मार्गाने जोडण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा. तसेच, हे प्रकल्प गतीने मार्गी लागतील यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची मागणी बदलापूरचे माजी नगराध्यक्ष राम पातकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

माजी नगराध्यक्ष राम पातकर यांच्या मूलभूत सुविधांतर्गत आशय असलेल्या या पत्राची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. मुख्यमंत्र्यांच्या आदेशावरून नगरविकास विभागाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त यांना पत्र लिहून ठाणे भिवंडी कल्याण शहराकडे येणारी मेट्रो ५ बदलापूर शहराकडे विस्तारित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. तसेच मुंबईतून कांजुरमार्ग ऐरोली शिळफाटा काटई ते बदलापूर प्रस्तावित मेट्रो १४ या मार्गिकेचे काम युध्दपातळीवर सुरू होईल यादृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या आहेत.

कल्याण ते बदलापूर आणि कांजुरमार्ग ते बदलापूर मेट्रो मार्गासंदर्भात आवश्यक त्या कार्यवाही करून स्वयंस्पष्ट अहवाल नगरविकास विभागाचे अवर सचिव अजयसिंग पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशावरून मागविला आहे.

मागील दोन ते तीन वर्षापासून पातकर कल्याणचा मेट्रो मार्ग बदलापूरपर्यंत विस्तारित करण्यासाठी आणि प्रस्तावित कांजुरमार्ग ते काटई बदलापूर मेट्रो १४ मार्गाचे काम युध्दपातळीवर सुरू होईल यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत.



मुंबईजवळचे एक आखीव रेखीव पध्दतीने विकसित होणारे, एक शांत शहर म्हणून बदलापूर शहर परिसराची ओळख आहे. त्यामुळे अधिक संख्येने नागरिक निवासासाठी या शहराला पसंती देत आहेत. या शहरातील बहुतांशी वर्ग हा मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पश्चिम उपनगरात नोकरी करणारा आहे. या वाढत्या लोकसंख्येला प्रवासासाठी फक्त रेल्वे मार्ग हा एकमेव आधार आहे. त्यामुळे रस्ते, रेल्वे मार्गा बरोबर बदलापूर शहर मेट्रो मार्गांनी जोडणे आवश्यक आहे, असे पातकर यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणले.ठाणे, भिवंडी ते कल्याण मेट्रो ५ मार्गाचे काम गतीने सुरू आहे. हे काम सुरू असताना कल्याण शहरातून जाणाऱ्या मेट्रोचा मार्ग आता शिवाजी चौक मार्गे न ठेवता तो आधारवाडी चौक, खडकपाडा, बिर्ला महाविद्यालय, प्रेम ऑटो, शहाड पेट्रोल पंप, सुभाष चौक ते कल्याण पश्चिम असा आहे. कल्याणमधील हाच मेट्रो ५ मार्ग सुभाष चौक, विठ्ठलवाडी, उल्हासनगर, अंबरनाथ, लादी कारखाना, फॉरेस्ट नाका, बदलापूर बस स्थानकापर्यंत मेट्रो १४ पर्यंत विस्तारित करावा. फॉरेस्ट नाका ते चिखलोली येथे कल्याण मेट्रो मार्ग मेट्रो १४ ला जोडावा. या मेट्रो मार्ग जोडण्यांमुळे बदलापूर शहर मुंबई, ठाणे, कल्याण, तळोजा मेट्रोमार्गामुळे एकाचवेळी जोडले जाणार आहे. या भागात मेट्रो मार्ग सुरू असताना बदलापूर मेट्रो मार्गाची कामे त्वरेने हाती घेण्याची मागणी पातकर यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

# भावनिक नात्याचं प्रतिक : करवा चौथ

‘करवा’ म्हणजे मातीचा कलश किंवा भांडे आणि ‘चौथ’ म्हणजे चतुर्थी. कार्तिक महिन्यातील कृष्णपक्षाची चतुर्थी या दिवशी ‘करवा चौथ’ साजरा केला जातो. या दिवशी विवाहित स्त्रिया सूर्योदयापासून ते चंद्रदर्शनापर्यंत उपवास धरून पतीच्या दीर्घायुष्याची व सुखी वैवाहिक जीवनाची प्रार्थना करतात. भारत हा सण-उत्सवांचा देश आहे. प्रत्येक प्रांतातील वेगवेगळ्या प्रथा-परंपरा येथे जपल्या जातात. त्यातही स्त्रीच्या सौभाग्यासाठी व पतीच्या दीर्घायुष्यासाठी साजरा होणारा ‘करवा चौथ हा व्रतप्रधान सण विशेष महत्त्वाचा मानला जातो. उत्तर भारतातील पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थान, उत्तर प्रदेश या भागात हा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. आता त्याचा प्रभाव महाराष्ट्रासह इतर राज्यांतही दिसून येतो. करवा चौथ ही केवळ धार्मिक परंपरा नसून पती-पत्नीतील भावनिक नात्याचे प्रतीक आहे. या सणामुळे स्त्रियांच्या आयुष्यात श्रद्धा, संयम व कुटुंबाबद्दलची निष्ठा दृढ होते. स्त्रियांची सजावट, मेहंदी, नृत्य, गाणी या माध्यमातून आनंद व उत्साह निर्माण होतो. आजच्या काळात नवरा-बायको दोघेही एकमेकांसाठी उपवास करतात ही एक नवी सकारात्मक परंपरा उदयाला येत असुन या सणाला सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. आधुनिक काळातील बदल म्हणजे पूर्वी करवा चौथ हा सण फक्त पारंपरिक पद्धतीने ग्रामीण व शहरी घरांमध्ये साजरा होत असे. आता मात्र चित्रपट, मालिका, सोशल मीडियाच्या प्रभावामुळे या सणाची लोकप्रियता संपूर्ण देशभर वाढली आहे. शहरी भागात महिलांसाठी खास करवा चौथ समारंभ, फॅशन शो, मेहंदी स्पर्धा यांचे आयोजन केले जाते. करवा चौथ हा सण स्त्रीच्या श्रद्धा, प्रेम आणि समर्पणाचा प्रतीक आहे. पतीच्या



दीर्घायुष्यासाठी स्त्रिया करीत असलेले हे व्रत केवळ धार्मिक नसून कौटुंबिक ऐक्य व वैवाहिक जीवनातील बंध दृढ करणारा आहे. बदलत्या काळानुसार या सणाच्या पद्धतीत फेरबदल झाले असले तरी त्यामागचा मुख्य उद्देश आजही तितकाच जिवंत आहे, पती-पत्नीतील प्रेम आणि कुटुंबाचे सुख-समाधान.

करवा चौथशी निगडित अनेक कथा प्रचलित आहेत. त्यापैकी एक कथा सती सावित्रीची आहे. सावित्रीने आपल्या तपश्चर्येने मृत्यूदेव यमराजालाही पती सत्यवानाचे प्राण परत द्यावे लागले होते. त्यामुळे या व्रताचा संबंध पतीच्या आयुष्याशी जोडला गेला आहे. दुसरी कथा पांडवांच्या काळाशी निगडित आहे. म्हणे, द्रौपदीनेही पती अर्जुनाच्या कल्याणासाठी करवा चौथचे व्रत केले होते. त्यामुळे पतीच्या सुरक्षिततेसाठी व सौख्यासाठी हे व्रत स्त्रिया आचरणात आणतात. करवा चौथ व्रताची पद्धत म्हणजे सकाळची सुरुवात विवाहित स्त्री सूर्योदयापूर्वी ‘सर्गी’नावाचे भोजन करते. हे भोजन प्रामुख्याने सासरच्या मंडळींकडून दिले जाते. तसेच, दिवसभर अन्न व पाणी न घेता उपवास केला जातो. दिवसभर स्त्रिया सजतात, मेहंदी लावतात, नटतात. संध्याकाळचा पूजाविधीच्या वेळी करव्यामध्ये पाणी, धान्य भरले जाते. सखी-सोबती स्त्रिया एकत्र बसून पूजा करतात व आख्यायिका ऐकतात आणि शेवटी चंद्रदर्शन रात्री चंद्र उगवल्यावर त्याला चलणी अथवा जाळीदार वस्त्रातून पाहिले जाते. त्यानंतर पतीला त्याच चलणीतून पाहून पतीच्या हातून पाणी व अन्न घेऊन उपवास सोडला जातो.

करवा चौथ म्हटले की डोळ्यासमोर येते ते सुहागिन बायका, चंद्राला चलनीतून पाहणारी दृश्ये आणि पतीच्या दीर्घायुष्याची प्रार्थना. पण आजच्या आधुनिक काळात हा सण फक्त पती-पत्नीपुरता मर्यादित राहिलेला नाही. आता तरुण प्रेमिके-प्रेमिकाही करवा चौथ साजरा करून आपल्या नात्यातील बंध अधिक घट्ट करतात. प्रेमिकांसाठी करवा चौथ म्हणजे प्रेमाचे व्रत. दिवसभर न खाता-पिता एकमेकांसाठी उपवास करणे ही केवळ परंपरा नाही, तर एकमेकांसाठी असलेली काळजी आणि निष्ठा व्यक्त करण्याचा सुंदर मार्ग आहे. मुलगी आपल्या प्रियकराच्या यशासाठी, तर मुलगा आपल्या प्रेयसीच्या सुखासाठी प्रार्थना करतो. आज सोशल मीडियाच्या युगात जोडपी हा दिवस खास बनवतात. गिफ्ट्स देऊन, चंद्र पाहून एकत्र व्रत सोडून आणि आयुष्यभर एकमेकांसोबत राहण्याच्या वचनांनी. करवा चौथ प्रेमिकांसाठी केवळ धार्मिक विधी नसून, तो प्रेम, विश्वास आणि एकत्रित आयुष्याची आशा जपणारा सण बनला आहे. काही पारंपरिक विचारांचे लोक याकडे वेगळ्या नजरेने पाहतात, कारण करवा चौथ मूळतः वैवाहिक बंधनासाठी होता. मात्र बदलत्या काळात हा सण नात्यांमध्ये विश्वास, समर्पण आणि प्रेम वाढवणारा म्हणून तरुण पिढीत वेगळ्या अंगाने स्वीकारला जातो. आजच्या पिढीसाठी करवा चौथ हा फक्त पती-पत्नीपुरता मर्यादित न राहता प्रेमिक-प्रेमिकांच्या नात्यातील भावनिक जवळीक वाढवणारा सण ठरत आहे. प्रेमात असलेली जोडपी हा दिवस आपापल्या पद्धतीने साजरा करून नात्यातील प्रेम, आदर आणि बांधिलकी अधिक दृढ करतात.

एकेकाळी एका नवविवाहित महिलेने आपल्या माहेरी असतांना हे व्रत केले. ती सुस्वरूप अशी युवती होती. तिने कठोरपणे आपला उपवास पालन केला. तिच्या तपाने तिला दीर्घायुष्य मिळाले. भावांनी जवळच्या डोंगरावर अग्नी प्रज्वलित केला आणि तिला सांगितले की चंद्र उगवला आहे. व्रताची समाप्ती करताना चंद्राचे दर्शन घेण्यासाठी ती तिथे गेली पण तिला लक्षात आले की भावांनी आपल्याला फसविले आहे. तिचे व्रत मोडल्याने तिच्या पतीच्या निधनाची बातमी तिला समजली. ती बातमी कळताच ती आपल्या पतीच्या घरी निघाली. वाटेत तिला शिव पार्वती भेटले आणि त्यांनी तिला असे का घडले असावे हे कथन केले. पार्वतीने तिला आपल्या करंगळीच्या टोकातून थोडे रक्त दिले आणि आपल्या पतीच्या मुखावर शिंपडण्यास सांगितले. भविष्यकाळात तिने अगदी कठोरपणे हे व्रत पाळण्याचा सल्लाही देवीने तिला दिला. सासरी पोहोचल्यावर तिने पार्वतीने दिलेले रक्त पतीच्या मुखावर शिंपडले आणि तो पुनरूज्जीवित झाला. त्यानंतर या महिलेने निष्ठेने करवा चौथ व्रत पालन केले आणि तिला सुख समृद्धी प्राप्त झाली अशी या व्रतामागील आख्यायिका आहे.

करवा चौथ हे हिंदू व्रत आहे. हे व्रत दिल्ली, हरियाणा, राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, जम्मू, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश या प्रांतात केले जाते. आश्विन कृष्ण चतुर्थीच्या दिवशी विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुरोग्यासाठी आणि समृद्धीसाठी पूर्ण दिवस उपवास करतात. संध्याकाळी चंद्र उगवल्यावर चाळणीतून प्रथम चंद्राचे दर्शन व नंतर पतीचा चेहरा पाहतात. क्वचित अविवाहित स्त्रियाही आपल्या इच्छित पतीसाठी हे व्रत करतात. सनातन धर्माच्या लोकांसाठी करवा चौथ व्रताचे विशेष महत्त्व आहे. विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीधार्युष्यासाठी, उत्तम आरोग्यासाठी आणि सुखी वैवाहिक जीवनासाठी हे व्रत करतात. तथापि हा उपवास खूप कठीण आहे, कारण या उपवासात अन्नाबरोबरच पाणी पिण्यासही मनाई आहे, म्हणजेच हा निर्जल उपवास ठेवण्याचा नियम आहे. संध्याकाळी चंद्र देवाला जल अर्पण केल्यावरच हे वत मोडले जाते. करवा चौथ व्रताचे अनेक महत्त्वाचे नियम आहेत, त्यांचे पालन न केल्यास स्त्रियांना त्यांच्या पूजेचे पूर्ण फळ मिळत नाही.

यादिवशी गणपती आणि करवा देवी व्यतिरिक्त चंद्र देवाची पूजा करणे देखील महत्त्वाचे आहे. चंद्र देव हे वय, सुख, समृद्धी आणि शांतीसाठी जबाबदार ग्रह मानला जातो. करवा चौथच्या दिवशी चंद्र देवाची पूजा केल्याने वैवाहिक जीवन सुखी राहते. याशिवाय पतीचे वय वाढण्याची शक्यता ही वाढते. देशातील अनेक राज्यांमध्ये करवा चौथ चा उपवास करक चतुर्थी व्रत म्हणूनही ओळखला जातो, करवा चौथ व्रताचे महत्वाचे नियम करवा चौथ उपवास सूर्योदयापूर्वी सुरू होतो आणि चंद्र उगवल्यानंतर समाप्त होतो. चंद्र देवाचे दर्शन घेऊनच हे व्रत मोडावे. वास्तुशास्त्रानुसार संध्याकाळी शिव परिवाराची पूजा करताना स्त्रीचे तोंड पूर्वेकडे असावे. या दिशेला तोंड करून पूजा करणे शुभ असते.

पारंपरिकदृष्ट्या करवा चौथ हा सण विवाहित स्त्रिया पतीच्या दीर्घायुष्याच्या कामनेसाठी साजरा करतात. परंतु आधुनिक काळात, विशेषतः तरुणाईमध्ये, हा सण प्रेमिक-प्रेमिकांमध्ये देखील लोकप्रिय होत आहे. पूर्वी करवा चौथ हा फक्त सौभाग्यवती स्त्रियांचा सण मानला जात असे. पण आता प्रेमात असलेल्या जोडपीदेखील एकमेकांप्रती निष्ठा, प्रेम आणि बांधिलकी दाखवण्यासाठी हा दिवस साजरा करतात. या दिवशी अनेक तरुणी आपल्या बॉयफ्रेंडसाठी दिवसभर उपवास धरतात आणि त्याच्यासाठी सुख-समृद्धी व यशाची प्रार्थना करतात. तसेच, काही वेळा तरुण मुलंही आपल्या प्रेयसीसाठी उपवास करतात, जेणेकरून नात्यात समानतेचा आणि परस्पर प्रेमाचा संदेश जाईल.

आजकाल सोशल मीडियाच्या प्रभावामुळे करवा चौथ इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सॲपवर प्रेमिके-प्रेमिके करवा चौथच्या शुभेच्छा देतात, फोटो शेअर करतात. एकत्र उपवास - काही प्रेमिके उपवास एकत्र धरतात आणि चंद्र पाहिल्यावर नाते अधिक दृढ करण्याची प्रतिज्ञा करतात. बॉयफ्रेंड/गर्लफ्रेंड या दिवशी एकमेकांना खास भेटवस्तू व सरप्राईजेस देतात, ज्यामुळे हा दिवस संस्मरणीय ठरतो. पारंपरिक विधींची शाब्दिक नक्कल केली जाते, पण त्यामागे खरी भावना असते ती म्हणजे रोमँटिक अँगल एकमेकांवरील प्रेम आणि काळजी. सर्वांना करवा चौथ च्या हार्दिक शुभेच्छा.

**- प्रविण बागडे**

## खरं प्रेम ओळखायचंय? लक्षात ठेवा ‘हे’ ५ प्रेमाचे गुपित संकेत

प्रेमाचं जग हे कोड्यांनी भरलेलं असतं. कोणीतरी आपल्या आयुष्यात येतं, बोलतं, हसतं, काळजी घेतं... पण मनात एकच प्रश्न फिरत राहतो ही फक्त मैत्री आहे की काहीतरी खास? आजच्या डिजिटल आणि वेगवान काळात शब्दांपेक्षा कृती जास्त बोलतात. म्हणूनच, समोरच्या व्यक्तीच्या वागणुकीत दडलेले हे “गुप्त प्रेमसंकेत”

**१. नजरेतून बोलणं हा पहिला आणि प्रभावी सिग्नल**

प्रेम डोळ्यांतून सर्वात आधी व्यक्त होतं. समोरची व्यक्ती वारंवार तुमच्याकडे बघते का? नजरा मिळाल्यावर हळूच हसते का? तर हे योगायोग नसतात. डोळ्यांतून व्यक्त होणारी ती चमक आणि आपुलकी हा आकर्षणाचा पहिला संकेत असतो. खरी भावना शब्दांच्या पलीकडे जात, नजरांच्या खेळातून उलगडते.

**२. छोट्या गोष्टींकडे लक्ष देणं**

तुमच्या आवडीनिवडी, बोलण्याची शैली, कपड्यांचा रंग, किंवा अगदी कॉफी कशी आवडते या सगळ्या छोट्या गोष्टी लक्षात ठेवणं म्हणजे तुम्ही त्या व्यक्तीसाठी महत्त्वाचे आहात. खऱ्या भावनांसाठी नेहमी “care” हा शब्द पुरेसा नसतो, तर ती कृतीतून दिसायला हवी. जेव्हा कोणी तुमच्यासाठी अशा छोट्या गोष्टी लक्षात ठेवतं, तेव्हा ते नक्कीच मैत्रीपलीकडचं असतं.

**३. वेळ आणि लक्ष सर्वात मौल्यवान गोष्ट**

एखाद्या व्यक्तीने तुम्हाला वेळ देणं म्हणजे त्यांच्या जगात तुम्ही स्थान मिळवलं आहे. व्यस्त दिनक्रमातदेखील ते तुमच्यासाठी वेळ काढतात, तुमचे संदेश त्वरित वाचतात, उत्तर देतात, तुमच्याशी बोलण्यासाठी तयार असतात ही सर्व चिन्हं ‘interest’ची आहेत. प्रेमात वेळ आणि लक्ष हीच खरी गुंतवणूक असते.

**४. तुमच्यासोबत वागण्यातला वेगळेपणा**

जेव्हा एखादी व्यक्ती तुमच्यासाठी खास वागते, तेव्हा ते नजरेत आणि वागणुकीत दिसतं. तुमचं कौतुक करणं, तुमच्यासाठी छोट्या गोष्टी करणं, किंवा मदतीसाठी जास्त प्रयत्न करणं ही त्यांची आपुलकी दाखवण्याची पद्धत असते. त्यांच्या चेहऱ्यावर तुमच्या उपस्थितीमुळे येणारी झळाळी हे खऱ्या आकर्षणाचं प्रतिबिंब असतं.

**५. सोशल मीडियावरही दिसतं प्रेमाचं छुपं जग**

आजच्या काळात सोशल मीडिया हेही भावना व्यक्त करण्याचं माध्यम झालं आहे. तुमच्या प्रत्येक पोस्टला पहिला ‘लाईक’ कोण देतो, तुमच्या फोटोवर कोण कमेंट करतो, ग्रुपमध्ये तुम्हाला विशेष महत्त्व कोण देतो हे सगळं संकेत असतात. तुमच्या अनुपस्थितीत बेचैन होणं, तुमचं नाव घेताच आनंदी होणं ही सगळी चिन्हं ‘फक्त मित्र’ नव्हे तर ‘खास व्यक्ती’ असल्याचं दाखवतात.

खरं प्रेम ओळखण्यासाठी शब्दांची गरज नसते. डोळे, वेळ, लक्ष आणि वागणूक हेच त्याचे संकेत असतात. जेव्हा एखादी व्यक्ती तुम्हाला सतत आपल्या विचारात ठेवते, काळजी घेते आणि तुमच्यासाठी वेळ काढते तेव्हा तुम्ही त्यांच्या आयुष्यात फक्त एक “मैत्री” नाही, तर “महत्त्वाची व्यक्ती” बनलेले असता. प्रेम नेहमी मोठ्या गोष्टींत नसतं; ते छोट्या क्षणांत, नजरेत, हसण्यात आणि काळजीत दडलेलं असतं.



## जागतिक मानसिक आरोग्य दिन : भारतात तरुण व मुलांमधील वाढता ताणतणाव हा चिंतेचा विषय!




‘आपण ठीक आहोत’ हे वाक्य आता अनेकांच्या जीवनातील मुखवटा ठरत चालले आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या ताज्या अहवालानुसार जगातील सुमारे आठपैकी एक व्यक्ती मानसिक आरोग्य समस्यांनी त्रस्त आहे. भारतात ही परिस्थिती अधिक गंभीर असून सुमारे १० कोटींहून अधिक नागरिक कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील मानसिक आजारांचा सामना करत आहेत. कोविडनंतर वाढलेली चिंता, नैराश्य, ताण आणि सामाजिक एकटेपणा हे या स्थितीचे प्रमुख कारण ठरत आहेत. त्याचप्रमाणे तरुणांमधील व मुलामधील वाढता ताणतणाव हाही एक चिंतेचा विषय बनला आहे.

राष्ट्रीय मानसिक आरोग्य सर्वेक्षण (निम्हान्स) च्या आकडेवारीनुसार देशातील १०.६ टक्के प्रौढ नागरिकांना मानसिक आरोग्यविषयक त्रास आहे. महिलांमध्ये ७.३ टक्के आणि पुरुषांमध्ये ५.८ टक्के लोकांना नैराश्य आणि चिंतेचे विकार जाणवतात. १५ ते २४ वयोगटातील युवकांमध्ये आत्महत्येचे प्रमाण दरवर्षी सरासरी २३ टक्क्यांनी वाढत आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंदवही (एलसीआरबी २०२३) च्या आकडेवारीनुसार, भारतात दर ४० सेकंदाला एक व्यक्ती आत्महत्येचा प्रयत्न करत आहे.जागतिक आरोग्य संघटनेच्या ‘मानसिक आरोग्य अहवालानुसार जगभरात २८ कोटी लोक नैराश्याने पीडित असून त्यापैकी १५ टक्के भारतातील आहेत. द लॅन्सेट सायकॅट्रीच्या २०२४ च्या अहवालानुसार, कोविड-१९ नंतर भारतात चिंता आणि वाढता ताण या मध्ये तब्बल ३५ टक्के वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर मानसिक आरोग्याला शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्व देणे अत्यावश्यक ठरते.

मानसोपचार तज्ज्ञांच्या मते भारतात मानसिक आरोग्याकडे अजूनही कलंकित दृष्टीने पाहिले जाते. हे शरीराच्या इतर आजारांइतकेच गंभीर असून योग्य वेळी उपचार घेतल्यास पूर्ण बरे होऊ शकते. विद्यार्थ्यांमध्ये आणि कामगारांमध्ये ‘बर्नआउट’ सिंड्रोम, नैराश्य आणि चिंता वाढताना दिसतात. मानसिक आरोग्य हा राष्ट्रीय आरोग्य धोरणाचा अविभाज्य भाग व्हायला हवा.

युजीसीच्या २०२४ च्या अहवालानुसार देशातील तीनपैकी एक विद्यार्थी मानसिक तणावाखाली आहे. आयआयटी, एनआयटी आणि वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आत्महत्येचे प्रमाण गेल्या पाच वर्षांत ४२ टक्क्यांनी वाढले आहे. यासाठी अनेक विद्यापीठांमध्ये ‘कौन्सिलिंग सेल तसेच माइंडफुल कॅम्पास इनिशिएटिव्ह’ यांसारखे उपक्रम राबवले जात आहेत. मात्र हे प्रयत्न पुरेसे नसल्याचे दरवर्षी होणाऱ्या आत्महत्यांमधून स्पष्ट होते.

सरकारच्या बाजूने मानसिक आरोग्य क्षेत्रात काही सकारात्मक पावले उचलली गेली आहेत.यात ‘ नॅशनल टेली मेंटल हेल्थ प्रोग्राम (टेली मानस)’ अंतर्गत चोवीस तास सल्ला सेवा सुरू करण्यात आली असून, १४४१६ या हेल्पलाईन क्रमांकावर दररोज हजारो नागरिक सल्ला घेत आहेत. याशिवा जिल्हा मानसित आरोग्य कार्यक्रम व आयुश्मान भारत आरोग्य आणि वेलनेस सेंटर अंतर्गत मानसिक आजारांचे निदान आणि उपचार मोफत उपलब्ध आहेत. आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार या योजनांमुळे गेल्या दोन वर्षांत जवळपास दोन कोटी नागरिकांना मानसोपचार सल्ला देण्यात आला आहे.

महाराष्ट्र सरकारने सुरू केलेला “मन:संपदा प्रकल्प” राज्यातील मानसिक आरोग्य जनजागृतीसाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे. २०२४ मध्ये या प्रकल्पांतर्गत ३२ जिल्ह्यांत आरोग्य शिबिरे घेण्यात आली, सुमारे पाच लाख विद्यार्थी आणि दोन लाख महिला यांना समुपदेशन देण्यात आले. “आपलं मन ऐका” या मोहिमेअंतर्गत २०० पेक्षा अधिक मानसोपचार तज्ज्ञ ग्रामीण व शहरी भागात पोहोचले. तरीही महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा आजही चिंतेचा विषय आहे.

आयसीएमआर च्या २०२४ च्या अभ्यासानुसार, महिलांमध्ये प्रसूतिपश्चात नैराश्याचे प्रमाण ग्रामीण भागात १८ टक्के तर शहरी भागात ११ टक्के आहे. पुरुषांमध्ये अल्कोहोल व्यसनाधीनता गेल्या पाच वर्षांत १७ टक्क्यांनी वाढली आहे. मानसिक आजारांमुळे भारताच्या एकूण जीडीपीच्या १.३ टक्के इतका आर्थिक तोटा होत असल्याचे जागतिक बँकेने स्पष्ट केले आहे.जागतिक आरोग्य संघटना व युनिसेफच्या २०२४ संयुक्त अहवालानुसार, दररोज चार तासांपेक्षा जास्त सोशल मीडिया वापरणाऱ्या किशोरवयीन मुलांमध्ये चिंता व काहीतरी चुकण्याची भीतीची लक्षणे २.५ पट अधिक आढळतात. त्यामुळे तज्ज्ञ ‘डिजिटल डिटॉक्स’ आणि ऑफलाइन संवाद वाढवण्याचा सल्ला देत आहेत.

मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी तज्ज्ञांच्या मते दररोज किमान ३० मिनिटे चालणे किंवा योगाभ्यास करणे, दिवसातून एक वेळ डिजिटल ब्रेक घेणे, स्वतःच्या भावना लिहून ठेवणे, गरज वाटल्यास समुपदेशकाचा सल्ला घेणे आणि निसर्गाशी संवाद साधणे हे उपाय सर्वाधिक प्रभावी ठरतात. या वर्षीच्या जागतिक मानसिक आरोग्य दिनाची थीम आहे, “मानसिक आरोग्य हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे.” भारतात वाढता मानसिक ताण, बदलते सामाजिक वातावरण आणि कामाच्या स्पर्धात्मक स्वरूपामुळे “मन शांत, समाज सशक्त” हीच खरी गरज बनली आहे. मानसिक आरोग्याबाबत खुलेपणे बोलणे, लाज न बाळगता सल्ला घेणे आणि आपल्या आजूबाजूच्या लोकांशी संवाद साधणे हेच खऱ्या अर्थाने जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे संदेश आहे.

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रांगणात : एआयवर मानवी नियंत्रण

एआयच्या विश्वातलं सगळ्यात आधुनिक आणि चित्तथरारक प्रकरण एजंटिक एआयचं आहे. एजंटिक एआयमुळे सगळ्या जगात मोठ्या उलथापालथी होणार असल्याची भाकितं एकीकडे केली जात असताना एआय माणसावर भारी पडेल की काय, अशा प्रकारच्या चर्चा होण्याचं एक प्रमुख कारण म्हणजे एजंटिक एआयच आहे. एआयचे गॉडफादर जेफ्री हिंटन यांच्यापासून एआयच्या जगातल्या सगळ्या प्रख्यात तज्ज्ञांनी याविषयी अनेकदा दिलेले इशारे भयप्रद आहेत. एआयला माणसावर नियंत्रण प्रस्थापित करता येऊ नये, तसंच एआयनं त्याला आखून दिलेलं काम नेमकेपणानं करण्याचाच मार्ग कायम अवलंबला पाहिजे यासाठी तरतुदी करणं अत्यावश्यक असल्याचं स्वत: हिंटनसुद्धा आग्रहानं सांगतात. प्रत्यक्षात ही भीती आपल्याला का वाटते आणि ती किमान काही प्रमाणात तरी दूर करण्यासाठी नेमकं काय करता येऊ शकतं, याचा आज विचार करू.




एजंटिक एआयचं एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे अशा सॉफ्टवेअरला आपण दिलेलं स्वातंत्र्य. या सॉफ्टवेअरनं साधारणपणे कशा प्रकारे काम करावं, कोणते संदर्भ वापरावेत, काय करावं, काय करू नये याविषयीचे ढोबळ संकेत एजंटिक सॉफ्टवेअर लिहित असलेला प्रोग्रॅमर सूचनांच्या रूपानं देत असतो. जर एजंटिक सॉफ्टवेअरनं काही सूचनांनुसार अगदी तंतोतंतपणे काम करावं अशी अपेक्षा असेल तर या सूचना ढोबळपणानं न देता नेमकेपणानं द्याव्या लागतात. याचं एक उदाहरण घेऊ. समजा एका एजंटनं डॉलर आणि रुपया यांच्यामधला विनिमय दर एखाद्या ठरावीक वेबसाइटवरून घ्यावा असं आपण एजंटला सांगितलं असेल आणि नेमकं त्याच वेळेला ही वेबसाइट उपलब्ध नसेल तर? अशा वेळी एजंटिक सॉफ्टवेअर लिहित असलेल्या प्रोग्रॅमरला 'ही वेबसाइट उपलब्ध नसेल तर पर्याय म्हणून अमुक अमुक असं कर' असं एजंटला उद्देशून लिहावं लागतं. हे न केल्यास एजंट गोंधळून जाऊ शकतो. आता नेमकं काय करावं, हे त्याला 'सुचत' नाही – अगदी एखाद्या माणसासारखं.

याच्या पुढची पायरी म्हणजे काही बाबतींमध्ये एजंटला आपण अगदी काटेकोर सूचना न देता ढोबळ सूचना दिलेल्या असतील तर अशा वेळी एजंट 'स्वत:ला वाटेल त्या प्रकारे' कृती करण्याचा धोका उत्पन्न होऊ शकतो. नेमक्या अशाच प्रसंगी एआय माणसाला वरचढ होण्याची दाट शक्यता निर्माण होते. आपण वर उल्लेख केलेल्या डॉलर-रुपया उदाहरणात हा धोका अत्यंत नगण्य किंवा विचारातसुद्धा न घेण्यासारखा आहे. मात्र समजा एजंटिक आयचा वापर आपण काही धोकादायक कामांसाठी करत असलो आणि अशा वेळी संबंधित एजंटनं स्वत:हून काही निर्णय घेऊन त्यानुसार कामकाज करायला सुरुवात केली, तर काय होईल? ही शक्यता अशक्यप्राय अजिबातच नाही. यावर माणसाचं नियंत्रण कसं ठेवायचं?

एजंटिक एआयमध्ये यासाठी 'ह्यूमन इन द लूप (एचआयटीएल)' नावाची संकल्पना वापरली जाते. म्हणजेच एआयनं समजा काही महत्त्वाचे निर्णय स्वत: घेतलेले असतील तर ते घेऊन एआयला बेधडकपणे पुढे जाता येऊ नये आणि त्यापूर्वी एआयनं माणसाची परवानगी घ्यावी यासाठी एआयचं काम काहीसं स्थगित करून माणसानं परवानगी दिल्यावरच ते पुढे जावं अशी ही तरतूद असते. एआविषयीच्या असंख्य प्रकारच्या शंकाकुशंका, एआयच्या स्वातंत्र्याविषयीची भीती, नीतिमत्तेचे प्रश्न या सगळ्या मुद्द्यांमध्ये एचटीआयलची भूमिका महत्त्वाची ठरते. अर्थात एजंटिक सॉफ्टवेअर लिहित असलेल्या प्रोग्रॅमरने यासाठीच्या तरतुदी करणं गरजेचं असतं. त्या केलेल्या नसतील तर 'माणसाचं एआयवरचं नियंत्रण निघून जाण्याची' शक्यता निर्माण होते.

सारांश म्हणजे एजंटिक एआय या सॉफ्टवेअरच्या प्रकाराला आपण स्वयंचलित म्हणत असलो तरी हे स्वैर किंवा संपूर्ण स्वयंचलन असू शकत नाही. त्यावर माणसाचं नियंत्रण असलंच पाहिजे. कदाचित आज आपल्याला याचं महत्त्व समजत नसेल. किंवा कदाचित अजून एजंटिक एआय तितकंसं प्रचलित नसल्यामुळे तसंच त्याविषयी फारसं बोललं जात नसल्यामुळे हा मुद्दा गौण असल्याचा गैरसमज अनेक लोक करून घेत असावेत. जसजशी एजंटिक एआयची क्षमता आणि त्याचा वापर वाढत जाईल तसतसा हा मुद्दा जास्त प्रकर्षानं चर्चेला येईल. तेव्हा फक्त 'खूप उशीर' झालेला नसेल, ही आशा!

# नैतिक कथा : दयाळू शेतकरी आणि कोल्हा

एका गावात एक शेतकरी राहत होता. तो शेतीत व्यस्त असताना, त्याची पत्नी आली आणि त्याच्यासाठी जेवणाचा डबा ठेऊन गेली. जेव्हा शेतकऱ्याला मोकळा वेळ मिळाला तेव्हा त्याने जेवण्याचा निर्णय घेतला. पण काय झाले? अन्नाचा डबा रिकामा होता. शेतकऱ्याला वाटले की त्याची पत्नी विनोद करत आहे आणि तो रागावला. तो घरी परतला आणि त्याच्या पत्नीवर रागावला.



दुसऱ्या दिवशी, ती शेतकऱ्याला वेगळ्या डब्यात अन्न देण्यासाठी गेली. शेतकऱ्याला व्यस्त पाहून, ती तिथेच अन्न सोडून घरी परतली. थोड्या वेळाने, एक कोल्हा आला आणि त्याने त्याचे तोंड डब्यात घालून अन्न खाण्याचा प्रयत्न केला. यावेळी, तो अयशस्वी झाला आणि त्याचे तोंड डब्यात अडकले. कोल्हा ओरडू लागला. कोल्हाला अशा अवस्थेत पाहून शेतकऱ्याला कळले की आदल्या दिवशी त्याचे अन्न कुठे गायब झाले होते. त्याने काठी घेतली आणि कोल्हाजवळ गेला. कोल्हाने त्याला आपला जीव वाचवण्याची विनंती केली. शेतकऱ्याला कोल्हाची दया आली आणि त्याने त्याला भांड्यातून मुक्त केले. कोल्ह्याने शेतकऱ्याचे आभार मानले आणि त्याला मदत करण्याचे आश्वासन देऊन निघून गेला.

कोल्हाळ थेट राजाकडे गेला आणि शेतकऱ्याबद्दल सर्व काही सांगितले. राजा त्याच्या शेतासाठी अशाच कष्टाळू शेतकऱ्याच्या शोधात होता आणि त्याने त्या शेतकऱ्याला राजवाड्यात आणण्यास सांगितले. कोल्हा शेतकऱ्याच्या घरी गेला आणि त्याला दुसऱ्या दिवशी सकाळी निघण्यास तयार राहण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी शेतकरी आणि कोल्हा राजवाड्याकडे निघाले. राजवाड्याजवळ येताच शेतकरी घाबरला. त्याला वाटले की कोल्हा राजाला सांगेल आणि त्याला शिक्षा करेल. घाबरून शेतकरी राजवाड्यात शिरला. राजा शेतकऱ्याला पाहून आनंदित झाला, पण शेतकरी भीतीने थरथर कापत होता. मग राजाने शेतकऱ्याला सांगितले की त्याने त्याला शिक्षा करण्यासाठी नाही तर नोकरी देण्यासाठी बोलावले आहे. राजाने शेतकऱ्याला कामावर ठेवले आणि त्याची सर्व गरिबी दूर केली. व शेतकऱ्याने कोल्ह्याचे आभार मानले.

# पुरुष की महिला, कोणाला जास्त व्यायामाची गरज आहे? कारणे जाणून घ्या

आरोग्य आणि तंदुरुस्ती ही आजकालची केवळ ट्रेंड नाही तर एक गरज आहे. निरोगी शरीर आपल्याला आपल्या दैनंदिन जीवनात सक्रिय आणि उत्पादक ठेवते. पण अनेकदा प्रश्न पडतो: पुरुष की महिलांना जास्त व्यायामाची गरज आहे? हार्मोनल बदल आणि मासिक पाळीमुळे महिलांनी व्यायामावर अधिक लक्ष केंद्रित करावे का? की पुरुषांना स्नायूंच्या वस्तुमान आणि चरबी जाळण्याची जास्त गरज आहे? या लेखात, आपण पुरुष आणि महिलांच्या व्यायामाच्या गरजा का वेगळ्या असतात आणि कोणत्या परिस्थितीत कोणाला जास्त व्यायामाची आवश्यकता असते याचा तपशीलवार शोध घेऊ.



**१. शरीराची रचना आणि चयापचयातील फरक**

पुरुष आणि महिलांच्या शरीराच्या रचनेत आणि चयापचय दरात लक्षणीय फरक आहेत. पुरुषांमध्ये स्नायूंचे वस्तुमान जास्त असते, ज्यामुळे त्यांचे चयापचय गतिमान होते. दरम्यान, महिलांचे शरीर अधिक चरबी साठवते, विशेषतः कंबर आणि मांड्यांमध्ये. चरबी जाळण्यासाठी आणि हार्मोनल संतुलन राखण्यासाठी महिलांना अधिक नियमित व्यायामाची आवश्यकता असते. पुरुषांना स्नायूंचा टोन आणि कार्डिओ हेल्थ राखण्यासाठी देखील व्यायामाची आवश्यकता असते, परंतु महिलांसाठी ही गरज काहीशी जास्त मानली जाते.

**२. हार्मोनल बदल**

महिलांच्या शरीरात दर महिन्याला मासिक पाळी, गर्भधारणा आणि रजोनिवृत्ती येते. या सर्व परिस्थितींमुळे हार्मोनल बदल होतात जे शरीराचे वजन, मनःस्थिती आणि उर्जेच्या पातळीवर थेट परिणाम करतात. या बदलांचे व्यवस्थापन करण्यासाठी महिलांना अधिक व्यायामाची आवश्यकता असते. व्यायामामुळे शरीरात एंडोर्फिन नावाचे आनंदी हार्मोन्स बाहेर पडतात, जे मूड स्विंग आणि तणाव कमी करतात.

**३. मानसिक आरोग्याच्या गरजा**

व्यायाम केवळ शारीरिक आरोग्यासाठीच नाही तर मानसिक आरोग्यासाठी देखील महत्त्वाचा आहे. संशोधनातून असे दिसून आले आहे की महिलांना पुरुषांपेक्षा जास्त भावनिक दबाव, ताण आणि चिंता जाणवते, मग ते त्यांच्या नोकरीमुळे असो किंवा घरगुती जबाबदाऱ्यांमुळे असो. योग, ध्यान आणि कार्डिओ वर्कआउट्स महिलांमध्ये नैराश्य आणि चिंता कमी करण्यास मदत करतात. म्हणूनच, मानसिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून महिलांना अधिक व्यायामाची आवश्यकता असते.

**४. हाडे आणि स्नायूंची ताकद**

३० वर्षांच्या वयानंतर, महिलांना कॅल्शियमची कमतरता आणि हाडांची घनता कमी होते. रजोनिवृत्तीनंतर हा धोका वाढतो. वजन प्रशिक्षण आणि स्ट्रेचिंग व्यायाम महिलांमध्ये ऑस्टियोपोरोसिस सारख्या आजारांना प्रतिबंधित करण्यास मदत करतात. पुरुषांना स्नायूंचे नुकसान टाळण्यासाठी देखील व्यायामाची आवश्यकता असते, परंतु हाडांच्या कमकुवतपणामुळे महिलांमध्ये व्यायामाची भूमिका आणखी महत्त्वाची बनते.

**५. आहार नियंत्रण आणि चरबी व्यवस्थापन**

महिलांमध्ये सामान्यतः पुरुषांपेक्षा शरीरातील चरबीचे प्रमाण जास्त असते. शिवाय, हार्मोनल घटकांमुळे महिलांमध्ये जलद वजन वाढण्याची शक्यता जास्त असते. म्हणून, महिलांना त्यांच्या चरबीचे प्रमाण नियंत्रित करण्यासाठी आणि त्यांचे चयापचय सक्रिय ठेवण्यासाठी अधिक नियमित व्यायामाची आवश्यकता असते. यामुळे त्यांना त्यांचे वजन व्यवस्थापित करण्यास आणि थकवा टाळण्यास मदत होते.

# करपलेली चपाती, कुरकुरीत ब्रेड खाणं आरोग्यासाठी धोकादायक

भारतीय घरात चपाती म्हणजे रोजच्या जेवणाचा अविभाज्य भाग. सकाळचा नाश्ता, दुपारचं जेवण, ऑफिसचा डबा सर्वत्र चपाती असतेच.

पण हीच चपाती जर चुकीच्या पद्धतीनं बनवली, तर ती आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते, हे ऐकून अनेकांना धक्का बसेल. अलीकडच्या संशोधनांनुसार, जास्त भाजलेली किंवा करपलेली चपाती, ब्रेड आणि तंदुरी पदार्थांमुळे शरीरात कॅन्सर निर्माण करणारे घटक तयार होऊ शकतात.



**कसा निर्माण होतो हा धोका?**

चपाती किंवा ब्रेड जेव्हा खूप जास्त तापमानावर भाजले जातात, तेव्हा त्यातून 'एक्रिलामाइड' (Acrylamide) नावाचं रासायनिक संयुग तयार होतं. हे घटक दीर्घकाळ शरीरात साचल्यास डीएनएला नुकसान पोहोचवू शकतात आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांची शक्यता वाढते.

तसंच, गॅसवर थेट भाजताना चपातीच्या पृष्ठभागावर काळे डाग तयार होतात. हे काळे भाग म्हणजेच कार्सिनोजेनिक म्हणजेच कॅन्सर वाढवणारे पदार्थ. म्हणूनच चपाती "गोल्डन ब्राऊन" रंगाची झाली की गॅसवरून उतरवावी.

**संशोधनातून काय समोर आलं?**

'न्युट्रिशन अँड कॅन्सर' या जर्नलमधील संशोधनात सांगण्यात आलं की, जास्त तापमानावर शिजवलेले पदार्थ जसे की चपाती, ब्रेड, फ्रेंच फ्राईज यामध्ये एक्रिलामाइड तयार होतो. तर 'एन्व्हायरमेंट सायन्स अँड टेक्नॉलॉजी' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, गॅस आणि कुकटॉपमधून उत्सर्जित होणारे नायट्रोजन डायऑक्साइड आणि कार्बन मोनोऑक्साइड हे वायू दीर्घकाळ श्वासोच्छवासात गेले तर श्वसनविकार, हृदयाचे आजार आणि अगदी कॅन्सरचाही धोका वाढवू शकतात.

**काय काळजी घ्यावी?**

चपाती गॅसवर थेट जाळू नका; तव्यावरच हळू शेकवा, चपातीवर काळे डाग पडू देऊ नका, करपलेला ब्रेड किंवा रोटी खाणं टाळा, बेकरी पदार्थ 'गोल्डन ब्राऊन' रंगाचे असावेत; काळसर झाल्यास त्यातील भाग काढून टाका, रोजच्या आहारात मल्टीग्रेन ब्रेड आणि पूर्ण गव्हाची चपाती वापरा, शक्य असल्यास घरातील गॅस शेगडीजवळ योग्य वायुवीजन ठेवा.

**ब्रेड आणि रोटीचा योग्य वापर**

आरोग्यासाठी ब्रेड किंवा चपाती पूर्णपणे टाळणं गरजेचं नाही, पण ते मर्यादेत आणि योग्य पद्धतीने बनवणं अत्यावश्यक आहे.

व्हाईट ब्रेड किंवा बनावट ब्राऊन ब्रेडऐवजी मल्टीग्रेन ब्रेड वापरणं चांगलं. आणि रोटी शेकताना "गोल्डन ब्राऊन" रंगावरच थांबणं हीच आरोग्यदायी सवय आहे.

# काजू कतली




**साहित्य :** काजूची पावडर- २ कप, साखर- १ कप, तूप- २ चमचे, पाणी- अर्धा कप, चांदीचा वर्ख

**कृती :** सर्वात आधी काजू मिक्सरमध्ये बारिक करून पावडर तयार करून घ्या.आता कढईत पाणी गरम करून त्यात साखर घालून पुर्णपणे विरघळवून घ्या.दोन तारी साखरेचा पाक तयार झाल्यानंतर त्यामध्ये काजूची पावडर टाकून मिक्स करा.हे मिश्रण घट्ट झाल्यावर गॅस बंद करा आणि थंड करून घ्या.आता एका प्लेटला तूप लावून त्यावर मिश्रण थापून घ्या, यासाठी लाटणेही वापरू शकता.१० ते १५ मिनिटांनंतर तयार मिश्रणाच्या वड्या करून त्यावर चांदीचा वर्ख लावा.गोड काजू कतली खाण्यासाठी तयार आहे.


दैनिक लोकरक्षणाय

सर्व सर्जनशील वाचकांसाठी संधी




माहितीयुक्त, जागरूकता पसरवणारे, कायद्याचे ज्ञान देणारे स्वलिखित लेख




भावनात्मक, जागरूकता पसरवणारे, ज्ञान-बोध देणारी स्वलिखित कविता




पौष्टिक आणि सत्त्वयुक्त, स्वादिष्ट, आगळ्या-वेगळ्या पाककला रेसिपी




सामान्यातून असामान्य, वीरता, यश, प्रेरणात्मक, बोध कथा




महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळांची, समृद्ध सांस्कृतिक वारशाची माहिती

ध्यास+

समुदायातील सकारात्मक आवाजांना बळकटी देण्यासाठी एक व्यासपीठ

ध्यास सकारात्मकतेचा

# ‘तारक मेहता...’मध्ये ‘हा’ कलाकार पुन्हा परतणार? व्हिडीओ शेअर करत म्हणाला, “मी खूप दिवसांनी...”



‘तारक मेहता का उल्टा चश्मा’ गेल्या अनेक वर्षांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. या मालिकेतील सर्वच पात्रांची वेगळी वैशिष्ट्ये आहेत. आता एक आनंदाची बातमी समोर आली आहे. ही बातमी ऐकून चाहते खूप आनंदी होतील. या मालिकेत एक कलाकारा पुन्हा परतणार आहे, त्याने स्वतः याबद्दल संकेत दिले आहेत.

‘तारक मेहता का उल्टा चश्मा’ या मालिकेतील आपण ज्या पात्राबद्दल बोलत आहोत ते दुसरे तिसरे कोणी नसून रोशन सोढीची भूमिका करणारा अभिनेता गुरुचरण सिंह आहे. सोढीची भूमिका नेहमीच लक्षात ठेवणारा गुरुचरण बऱ्याच काळापासून अभिनयापासून दूर आहे. एका वर्षापूर्वी गुरुचरण बेपत्ता झाल्याची बातमी आली होती. सुमारे तीन आठवड्यांनंतर गुरुचरण स्वतःहून घरी परतला. शोमधील त्याचे चाहते अजूनही त्याची खूप आठवण काढतात. आता गुरुचरणने त्याच्या चाहत्यांना एक आनंदाची बातमी दिली आहे.

**गुरुचरणची पोस्ट**

गुरुचरणने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. व्हिडीओमध्ये तो म्हणतो, “आज मी खूप दिवसांनी तुम्हा सर्वांसमोर आलो आहे. बाबाजींनी माझ्या कुटुंबाच्या आणि तुमच्या सर्व चाहत्यांच्या प्रार्थना ऐकल्या आहेत. मी तुम्हा सर्वांचे मनापासून आभार मानतो. माझ्याकडे खूप चांगली बातमी आहे, जी मी लवकरच तुमच्या सर्वांबरोबर शेअर करेन. माझ्यासाठी प्रार्थना केल्याबद्दल सर्वांचे आभार आणि मी ते कधीही विसरणार नाही.”



गुरचरण सिंहचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. लोक त्यावर सतत कमेंट करताना दिसत आहेत. एका नेटकऱ्याने त्यावर कमेंट करत लिहिले की, ‘जर तुम्ही तारक मेहता शोमध्ये परत आलात, तर यापेक्षा मोठी चांगली बातमी नसेल.’ दुसऱ्या नेटकऱ्याने म्हटले की, ‘याचा अर्थ तुम्ही शोमध्ये परत येत आहात.’ एकाने लिहिले की, ‘चांगल्या बातमीचा अर्थ तुम्ही तारक मेहता का उल्टा चश्मामध्ये येत आहात, पाजी?

१७ वर्षांनंतरही आजही ही मालिका टीआरपीमध्ये इतर मालिकांना मागे टाकत बऱ्याचदा अव्वल स्थानी असल्याचे पाहायला मिळते.

# पुन्हा दशावतार? प्रियदर्शिनी इंदलकरने दिली हिंट; म्हणाली, भैरवीची वेळ झाली...

मराठी सिनेसृष्टीत २०२५ मध्ये रिलीज झालेल्या 'दशावतार' चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. कोकणच्या निसर्गसौंदर्याने, तिथल्या संस्कृतीने आणि परंपरेने रंगलेला हा सिनेमा फक्त मनोरंजनापुरता नाही तर प्रेक्षकांना एक मोठा संदेश देणारा ठरला. या सिनेमाने बॉक्स ऑफिसवरही जोरदार कमाई केली आणि आता प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता आहे ती या चित्रपटाच्या सिक्वेलची. यासाठी प्रेक्षक दिग्दर्शकांकडे मागणीही करत आहे.

**मी एका पायावर काय एका अंगठ्यावर तयार**

या चित्रपटात वंदनाची भूमिका साकारलेली अभिनेत्री प्रियदर्शिनी इंदलकरने नुकतीच ‘नवशक्ति’ला मुलाखत दिली. यावेळी बोलताना, चित्रपटाचा सिक्वेल आल्यास त्यामध्ये काम करण्यास एका पायावर काय एका अंगठ्यावरही तयार असल्याचे ती म्हणाली.



"अनेक प्रेक्षक चित्रपटाचा दुसरा भाग यावा असे म्हणत आहेत, माझीही खूप इच्छा आहे. एका वाक्यावरून अनेकजण मेसेज करत आहेत. बाबुली काका सांगून जातायेत की...भैरवीची वेळ झाली... आता पुढची जबाबदारी तुझी... तू हा लढा पुढे चालव... यावरून चित्रपटाचा भाग २ आल्यास वंदना असेल त्यामध्ये असा अंदाज प्रेक्षक बांधत आहेत", असे ती म्हणाली. पुढे बोलताना, सिनेमाच्या दुसऱ्या भागात काम करण्यास एका पायावर नव्हे तर अंगठ्यावर देखील तयार असल्याचा पुनरुच्चार तिने केला. या विधानामुळे चाहत्यांमध्ये ‘दशावतार २’साठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

या चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांनी हाफ मॅड बाबुलीची भूमिका अत्यंत उत्कृष्ठ पद्धतीने साकारली आहे. त्यांचा अभिनय नेहमीच प्रेक्षकांच्या मनाला भिडतो. त्याशिवाय महेश मांजरेकर, भरत जाधव, सिद्धार्थ मेनन, अभिनय बेर्डे, विजय केंकरे, सुनील तावडे, रवी काळे, लोकेश मित्तल, आरती वडगबाळकर यांसारखे कलाकारही सिनेमात अप्रतिम भूमिका साकारताना दिसतात.

‘दशावतार’ने फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर विदेशातही आपली छाप सोडली आहे. सातासमुद्रापारही सिनेमाचे शोज झाले आणि प्रेक्षकांनी या सिनेमाचे भरभरून कौतुक झाले.

# रात्री ११:३० वाजता प्रसारण तरीही जबरदस्त टीआरपी !




आठवड्याच्या टॉप-५ मालिका कोणत्या आहेत? पाहा संपूर्ण यादी

छोट्या पडद्यावरील मालिकांची लोकप्रियता ही टीआरपीवरून ठरवली जाते. गेल्या काही महिन्यांत विविध वाहिन्यांवर अनेक नवनवीन मालिका सुरू झाल्या आहेत. आदिनाथ कोठारे, सोनाली खरे यांसारख्या अनेक प्रसिद्ध कलाकारांनी छोट्या पडद्यावर कमबॅक सुद्धा केलेलं आहे. त्यामुळे अर्थातच मालिका पाहणाऱ्या प्रेक्षकवर्गात दिवसेंदिवस वाढ होत असल्याचं पाहायला मिळतंय.

आदिनाथ कोठारेची मुख्य भूमिका असलेल्या ‘नशीबवान’ मालिकेला पहिल्या दिवसापासून प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. ही मालिका २७ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर या आठवड्याच्या टीआरपी रेटिंगनुसार तिसऱ्या क्रमांकावर आहे. ‘ठरलं तर मग’ मालिकेच्या टीआरपीत पुन्हा एकदा मोठी वाढ झाल्याचं पाहायला मिळतं. टीआरपीच्या यादीमधील अव्वलस्थान ‘ठरलं तर मग’ने कायम राखलं आहे. तर, ‘घरोघरी मातीच्या चुली’ आणि ‘कोण होतीस तू काय झालीस तू’ या दोन्ही मालिका टीआरपी चार्टमध्ये दुसऱ्या स्थानावर आहेत.

टीआरपीच्या यादीत या आठवड्यात एका मालिकेने सर्वाधिक लक्ष वेधून घेतलं आहे आणि ती म्हणजे ‘अबोली’. या मालिकेचं प्रसारण ‘स्टार प्रवाह’वर सध्या रात्री ११:३० वाजता केलं जातं. इतक्या उशिरा प्रसारित होऊनही या मालिकेने २.१ टीआरपी रेटिंग मिळवलं आहे.

याशिवाय रात्री साडेदहा वाजता प्रसारित होणाऱ्या ‘तू ही रे माझा मितवा’ या मालिकेने सुद्धा ३.८ रेटिंगसह टीआरपीच्या यादीत टॉप-५ मध्ये एन्ट्री घेतली आहे. यावरून या दोन्ही मालिकांची लोकप्रियता किती मोठ्या प्रमाणात आहे याचा अंदाज येतो. ‘अबोली’, ‘तू ही रे माझा मितवा’ यांना प्राइम टाइम नसूनही या मालिका टीआरपीच्या यादीत बाजी मारत आहेत.

**मालिकांचा टीआरपी**

१. ठरलं तर मग – ५.४
२. घरोघरी मातीच्या चुली – ४.५
कोण होतीस तू काय झालीस तू – ४.५
३. नशीबवान – ४.१
४. लक्ष्मीच्या पाऊलांनी – ४.०
५. तू ही रे माझा मितवा – ३.८
६. येड लागलं प्रेमाचं – ३.५
लग्नानंतर होईलच प्रेम – ३.५
७. अबोली – २.१ ( रात्री ११:३० )

दरम्यान, ‘स्टार प्रवाह’वर या महिन्यात ‘काजळमाया’ ही नवीन मालिका सुरू होणार आहे. त्यामुळे ही मालिका सुरू झाल्यावर ‘अबोली’ प्रेक्षकांचा निरोप घेणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. टीआरपीची आकडेवारी पाहून अनेकांनी ‘अबोली’ मालिका संपवू नका अशाही कमेंट्स पोस्टवर केल्या आहेत.

# ३ वर्षे जुना चित्रपट ओटीटीवर करतोय ट्रेंड, दमदार क्लायमॅक्स अन् ८.२ रेटिंग असलेला ‘हा’ सिनेमा तुम्ही पाहिलात का?

अनेकांना ओटीटीवर नवनवीन चित्रपट पाहायला आवडतात. काही चित्रपट थिएटर गाजवल्यानंतर ओटीटीवर राज्य करतात. असाच एक चित्रपट सध्या ट्रेंडिंग आहे. मुख्य म्हणजे हा चित्रपट तीन वर्षांपूर्वी रिलीज झाला होता. हा चित्रपट चर्चेत असण्याचं एक कारण म्हणजे त्याचा प्रीक्वल प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

या २ तास २७ मिनिटांच्या चित्रपटाची कथा तुम्हाला थक्क करेल. आम्ही नेमक्या कोणत्या चित्रपटाबद्दल बोलत आहोत आणि तो कोणत्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे, ते जाणून घेऊया.



**३ वर्षांपूर्वीचा चित्रपट ओटीटीवर ट्रेंडिंग**

एखादा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर तीन वर्षांनी ओटीटीवर ट्रेंड होतोय ही मोठी गोष्ट आहे. आम्ही ज्या चित्रपटाबद्दल बोलतोय त्याचं नाव ‘कांतारा’ आहे. तो २०२२ मध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. त्याचे बजेट फक्त १६ कोटी रुपये होते, पण त्याने जगभरात ४०० कोटी रुपयांची कमाई करून इतिहास रचला.

‘कांतारा’ चित्रपटाची कथा एका जंगलापासून सुरू होते. जमीनदाराला जंगल हडप करायचे असते. पण जंगलाजवळील एका गावातील लोक त्याला असं करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करतात, कारण त्यांना वाटतं की त्यांचे देव जंगलात राहतात आणि ते कोणालाही त्यांच्या देवांची जमीन हडप करू देणार नाहीत. यामुळे एक मोठा वाद निर्माण होतो आणि मग त्यात प्रशासन हस्तक्षेप करते. त्यानंतर चित्रपटाचा हिरो व पोलीस समोरासमोर येतात. या चित्रपटाचा क्लायमॅक्स अंगावर शहारे आणणारा आहे.

‘कांतारा’ तुम्हाला प्राइम व्हिडीओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर पाहता येईल. हा चित्रपट सध्या प्राइम व्हिडीओवर चौथ्या क्रमांकावर ट्रेंड करतोय. तुम्हाला ‘कांतारा’ हिंदीमध्ये पाहायचा असेल तर तो नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे.

**आयएमडीबीवर मिळाले ८.२ रेटिंग**

ऋषभ शेट्टीच्या ‘कांतारा’ या चित्रपटाचा प्रीक्वल ‘कांतारा चॅप्टर १’ नुकताच थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतोय. ‘कांतारा’ला आयएमडीबीवर १० पैकी ८.२ रेटिंग मिळाले आहे.

# ऋषभ शेट्टीच्या स्टारर 'कांतारा: चॅप्टर १' चित्रपटानं पहिल्या आठवड्यात ३०० कोटींची केली कमाई...

**अभिनेता ऋषभ शेट्टीचा 'कांतारा: चॅप्टर १' हा** चित्रपट प्रदर्शित झाल्याचा एक आठवडा पूर्ण करून आज, ९ ऑक्टोबर रोजी दुसऱ्या आठवड्यात दाखल झाला आहे. पहिल्याच आठवड्यात 'कांतारा: चॅप्टर १'नं 'कांतारा'च्या कमाईचा विक्रम मोडला आहे. या चित्रपटानं जगभरातील बॉक्स ऑफिसवर ४०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे. ऋषभ शेट्टी स्टारर चित्रपटानं देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर ३०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे.



'कांतारा: चॅप्टर १'चा पहिला वीकेंड धमाकेदार होता. या चित्रपटानं पहिल्याच वीकेंडला देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर २०० कोटींचा टप्पा ओलांडला. देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर ३०० कोटींपेक्षा जास्त कमाई केल्यानंतर, हा चित्रपट ४०० कोटींचा आकडा लवकरच पार करेल असं सध्या दिसत आहे.

**'कांतारा: चॅप्टर १' बॉक्स ऑफिस कलेक्शन :** 'कांतारा: चॅप्टर १' हा कन्नड उद्योगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट बनला आहे. 'कांतारा: चॅप्टर १' यशच्या 'केजीएफ: चॅप्टर २' (१,२५० कोटी) च्या मागे आहे. 'कांतारा: चॅप्टर १'नं कमल हासनच्या विक्रम (४१३ कोटी) आणि 'भूल भुलैया ३' (४११ कोटी) चे रेकॉर्ड देखील मोडले. आता असे मानले जाते की, 'कांतारा: चॅप्टर १' हा २०२५ मधील पहिला १००० कोटी कमाई करणारा चित्रपट ठरू शकतो. एसएसीएनआयएलसी यांच्यानुसार 'कांतारा: चॅप्टर १'नं भारतात ६१.८५ कोटींची सुरुवात केली.

दुसऱ्या दिवशी ४५.४ कोटी, तिसऱ्या दिवशी ५५ कोटी आणि चौथ्या दिवशी, रविवारी ६३ कोटींची कमाई केली. यासह, चित्रपटानं पहिल्या आठवड्यात देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर २२५.६२ कोटींची कमाई केली.

# धनत्रयोदशीला विशेष योग, राशीनुसार खरेदी करा या वस्तू

पंचागानुसार, आश्विन महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या तेराव्या दिवसाला ‘धनत्रयोदशी’ किंवा ‘धनतेरस’ असे म्हणतात. या वर्षी धनत्रयोदशी १८ ऑक्टोबर रोजी साजरी होणार आहे. या शुभ तिथीपासून दिवाळी सणाची सुरुवात होते. या दिवशी भगवान धन्वंतरी, लक्ष्मी देवी आणि संपत्तीची देवता कुबेर यांची पूजा करण्याची परंपरा आहे. बरेच लोक धनत्रयोदशीला विविध वस्तूंची खरेदी करतात. ज्योतिषांच्या मते, यंदा ग्रहांच्या हालचालीनुसार धनत्रयोदशीला अनेक शुभ योग तयार होत आहे. त्यामुळे राशीनुसार काही गोष्टींची खरेदी करणे फायदेशीर सांगितले जात आहे. चला तर मग जाणून घेऊयात धन्वंतरी, लक्ष्मी देवी



आणि कुबेर देवतेचा आशीर्वाद प्राप्त करण्यासाठी राशीनुसार कोणत्या वस्तू खरेदी कराव्यात.

**शुभ मुहूर्त –**

तिथी प्रारंभ – १८ ऑक्टोबर २०२५ दुपारी १.२० पासून

तिथी समाप्त – १९ ऑक्टोबर २०२५ दुपारी १.५४ पर्यंत

पूजा मुहूर्त – संध्याकाळी ७.१६ पासून रात्री ८.२० पर्यंत

प्रदोष काळ – संध्याकाळी ५.४८ पासून ते रात्री ८.१८ पर्यंत

**राशीनुसार खरेदी करा या वस्तू –**

**मेष राशी** – चांदी-तांब्यांची भांडी, लाल रंगाचे वस्त्र आणि माणिक रत्न खरेदी करणे शुभ ठरेल.

**वृषभ राशी** – चांदीचे दागिने-नाणी, पांढरे वस्त्र, हिरेजडित दागिने खरेदी करावेत.

**मिथून राशी** – पितळेची भांडी, चांदीची नाणी आणि सोन्याचे दागिने खरेदी करणे शुभ फळ देणारे ठरेल.

**कर्क राशी** – चांदीची नाणी, पांढरे वस्त्र खरेदी करावेत.

**सिंह राशी** – सोन्याचे दागिने, वाहन आणि पितळेच्या वस्तू खरेदी कराव्यात. तुम्ही माणिक रत्नाची खरेदी करू शकता.

**कन्या राशी** – फ्लॅट, दाग-दागिने, जमीन खरेदी करणे शुभ आहे.

**तुळा राशी** – धनत्रयोदशीला झाडू खरेदी करणे शुभ असते, कारण झाडू लक्ष्मीचे प्रतीक आहे.

**वृश्चिक राशी** – तांब्याची भांडी, चांदी, लाल रंगाच्या वस्तू. या वस्तू शक्य नसतील तर कोथिंबीर खरेदी करून घरी आणावी.

**धनु राशी** – सोन्याचे दागिने, पितळेच्या वस्तू तसेच श्री गणेश-लक्ष्मी देवीची मूर्ती खरेदी करावी.

**मकर राशी** – पिवळ्या रंगाच्या वस्तू, कपडे खरेदी करावेत. तसेच तुम्ही स्टीलच्या वस्तू, वाहनांची खरेदी करू शकता.

**कुंभ राशी** – पांढऱ्या रंगाच्या वस्तू, चांदीची नाणी आणि श्री गणेश- लक्ष्मीचे फोटो खरेदी करू शकता.

**मीन राशी** – सोन्याचे दागिने, पितळेची भांडी, पिवळे वस्त्र खरेदी करावे.




**मेष** – वरिष्ठांच्या सहकार्यानेच वागावे लागेल. अधिक परिश्रमाची कामे टाळा. मानसिक शांतता लाभेल. प्रवासाचे नियोजन कराल.

**वृषभ** – नवा परिचय होईल. आरोग्य उत्तम राहील. प्रतिस्पर्ध्यासोबत एखाद्या गहन चर्चेत सहभागी होऊ नका. खरेदी कराल.

**मिथुन** – मौजमजेसाठी पैसे खर्च होण्याची शक्यता आहे. काहीतरी नवनिर्मिती कराल. वाद-विवादात पडू नका. घरगुती कामे होतील.

**कर्क** – जोडीदारासोबत वेळ घालवाल. तुमच्या कामाची प्रशंसा होईल. शक्य असल्यास वाद टाळा. कार्याला योग्य दिशा मिळेल.

**सिंह** – अधिक खर्च होणार नाही याचे भान ठेवा. जुनी येणी वसूल होतील. आरोग्य जपा. महत्त्वाचे काम करण्यात आळस करू नका.

**कन्या** – चांगला प्रतिसाद मिळेल. मानसिक, शारीरिक परिश्रम अधिक होतील. वाहन जपून चालवा. धंद्यात काम मिळेल.

**तूळ** – नोकरीत आपले वर्चस्व राहील. घरात क्षुल्लक कारणावरून तणाव होईल. आर्थिक बाबतीत व्यवस्थित योजना तयार कराल.

**वृश्चिक** – कोर्टाच्या कामाला दिशा मिळेल. नातेवाईकांसोबत वादाचे प्रसंग येतील. वैचारिक दृढतेमुळे कामे चांगल्या रीतीने पूर्ण कराल.

**धनु** – धंद्यातील चर्चा यशस्वी होईल. आपण ठरवलेले काम पूर्ण करता येईल. मुलांची चिंता सतावेल. मान-सन्मान मिळेल.

**मकर** – नोकरीत कामाचा आळस करू नका. आपले वरिष्ठ प्रसन्न होतील. बोलण्यामुळे गैरसमज होणार नाहीत याचे भान ठेवा.

**कुंभ** – रेंगाळलेली कामे पूर्ण होतील. मैत्रीत वाढ होईल. वरिष्ठांपासून सांभाळून राहा. गृहस्थ जीवनाचा पूर्ण आनंद घ्याल. व्यवसायात यश मिळेल.

**मीन** – नवीन ओळखीचा उपयोग होईल. रचनात्मक आणि कलात्मक शक्तीला चालना मिळेल. तक्रारीला वाव देऊ नका.

# हवेचा गुणवत्ता निर्देशांक १०५ वर पोहोचला!

## मुंबईत हवेची गुणवत्ता घसरली; हिवाळ्यात प्रदूषणाचा उच्चांक गाठण्याची शक्यता



**मुंबई (विशाल कारंडे) :** भारतीय हवामान विभागाने (IMD) अद्याप पावसाळा संपण्याची अधिकृत घोषणा केली नसतानाही शहरातील हवेची गुणवत्ता झपाट्याने खालावत आहे. गुरुवारी (दि. ९) संध्याकाळी मुंबईचा एकूण वायू गुणवत्ता निर्देशांक (AQI) १०५ वर पोहोचला. त्यामुळे मान्सून काळात 'चांगल्या' श्रेणीत असलेली हवा आता 'मध्यम' श्रेणीत गेली आहे. तज्ज्ञांच्या मते, येणाऱ्या हिवाळ्यात प्रदूषणाचे प्रमाण आणखी वाढून 'अत्यंत खराब' स्तरावर पोहोचू शकते.

**वायु गुणवत्ता निर्देशांक १०० च्या पुढे; काही भागांत तीव्र प्रदूषण**

केंद्रीयप्रदूषण नियंत्रणमंडळाच्या (CPCB) आकडेवारीनुसार, गेल्या शनिवारी मुंबईचा AQI ४९ होता. तो रविवारी ६१, बुधवारी ७१ आणि गुरुवारी १०५ वर गेला. शहरातील काही भागांमध्ये प्रदूषणाचे प्रमाण अधिक आढळले असून, शिवडी येथे सर्वाधिक १५८, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स (१४८), देवनार (१४७) आणि बोरीवली (११३) असा AQI नोंदवण्यात आला.

वायु गुणवत्ता निर्देशांक पातळी ०-५० दरम्यान चांगली, ५१-१०० समाधानकारक, १०१-२०० मध्यम, २०१-३०० खराब, ३०१-४०० अत्यंत खराब आणि ४०० पेक्षा जास्त गंभीर मानली जाते. सध्या मुंबईतील हवा मध्यम श्रेणीत असून, काही ठिकाणी ती 'खराब' दिशेने सरकत आहे.

**मान्सून ओसरताच वाढले प्रदूषण**

मान्सून काळात वारंवार झालेल्या पावसामुळे धूलिकण धुऊन निघाल्याने प्रदूषणाचे प्रमाण नियंत्रणात होते. मात्र, पावसाचे प्रमाण घटल्याने वाढलेले तापमान आणि स्थिर हवामानामुळे वातावरणात धूर व धूळ साचू लागले आहेत.

पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, वाऱ्याच्या दिशेत झालेला बदल आणि सुरू असलेल्या बांधकाम प्रकल्पांमुळे निर्माण होणारी धूळ, तसेच आगामी दिवाळीतील फटाक्यांचा धूर या कारणांमुळे हवेची गुणवत्ता आणखी खालावण्याची शक्यता आहे.

**वायु गुणवत्ता निर्देशांक३५० च्या वर जाण्याची शक्यता - तज्ज्ञांचा इशारा**

बॉम्बे एन्व्हायरमेंट ॲक्शन ग्रुप (BEAG) चे सदस्य आणि वैज्ञानिक डॉ. तुहिन बॅनर्जी यांनी इशारा दिला की, "या हिवाळ्यात मुंबईतील हवेचे प्रदूषण मागील काही वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक असू शकते. हवामानातील बदलांमुळे वाऱ्यांचे स्वरूप विस्कळीत होईल आणि आधीच कमी असलेले वारे आणखी दुर्बल होऊ शकतात. वाऱ्यांचा अभाव राहिल्यास वायु गुणवत्ता निर्देशांक पातळी ३५० च्या वर जाण्याची शक्यता आहे."

**प्रशासनाला तज्ज्ञांचा इशारा**

IMD ने अद्याप मान्सून समाप्तीची अधिकृत घोषणा केली नसल्याने, शहर प्रशासनाने दीर्घकाळ टिकणाऱ्या हवेच्या खराब गुणवत्तेसाठी आधीच तयारी ठेवणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सुचवले आहे.

SPORTS

# ICC Women's World Cup 2025: Nadine Blitzkrieg Helps SA Seal Victory Against India In Vizag League Clash



**Visakhapatnam :** Fifties by skipper Laura Wolvaardt and Nadine de Klerk helped South Africa Women beat India Women by three wickets in a pulsating league game of the ODI Women's World Cup here on Thursday.

First, India rode on Richa Ghosh's impeccable 94 to post 251 on the board, but then Klerk single-handedly took the game away from India and also finished it in style by hitting a towering six.

South Africa chased the target with seven balls to spare. South Africa was reduced to 81 for 5 as Indian bowlers. Opener and skipper Laura Wolvaardt was going strong at one end and took the game deep. She scored 70 and raised the hopes of her team. But when it looked like she would score big, Kranti Gaud cleaned her up as South Africa lost their sixth wicket for 142, still needing over 100 runs for a win.

India needed just four wickets. However, Chole Tyron and Nadine de Klerk had other ideas as the duo forged a 69-run stand for the seventh wicket and kept the visitors in the hunt.

A brilliant review by Sneh Rana sent a dangerous Tyron packing as South Africa lost their seventh wicket for 211. It was going to be a dramatic finish as Klerk was standing between India and a win.

Klerk hammered Kranti Gaud for a couple of sixes and a four to bring down the equation to 24 runs off 21 balls. Eighteen runs came off the over.

South Africa needed 23 runs off 18 balls. Klerk was in her element as he took on Deepti Sharma in the next over and brought down the equation to run a ball.

The right-handed batter then hit two sixes in the penultimate over to seal the game for her side. It was a disappointment for India after dominating several parts of the game. This was India's first loss in the ongoing tournament.

Earlier, India Women rode on Ghosh's aggressive 94. Put into bat at the Dr Y.S. Rajasekhara Reddy ACA-VDCA Cricket Stadium, Indian openers Pratika Rawal (37) and Smriti Mandhana (23) added 55 runs for the first wicket. Mandhana was the first Indian batter who make the long walk back to the dressing room.

One-down Harleen Deol did not trouble the scorers as she was dismissed cheaply after making just 13 runs. India, after 17 overs, was poised at 83 for 2. The hosts then slipped to 102 for 6 as they lost four wickets in quick succession. Skipper Harmanpreet Kaur (9), Jemimah Rodrigues (0), Deepti Sharma (4) and Amanjot Kaur (13) failed miserably as South African bowlers dominated the innings.

It was then the Richa Ghosh show as she not only entertained the spectators but also pulled the team out of trouble. Richa hammered 11 boundaries and four maximums as she toyed with the South African attack.

It was the 88-run stand between Richa Ghosh and Sneh Rana (33 off 24 balls) that helped India Women pull things back. Rana hit six boundaries even as she supported Ghosh, who was going guns blazing from one end. Ghosh also notched up her 7th ODI half-century.

For the visitors, Chole Tryon was the pick of the bowlers as he returned with fine figures of 3 for 32. Ghosh's 94 is the highest score while batting at No.8 or lower in Women's ODIs. The record was held by Chloe Tryon, who scored 74 against Sri Lanka at Colombo earlier this year.

India Women have been unbeaten in the marquee tournament so far, having beaten Sri Lanka and Pakistan by 59 runs (DLS method) and 88 runs respectively.

# Premier League Deepens Commitment To Grassroots Football Development In India



**Mumbai :** The Premier League has reaffirmed its long-term commitment to supporting grassroots football in India through a Community Coach Development Programme in Mumbai. The three-day programme was central to the League's week-long fan and community engagement initiatives in India – its first major milestone since the opening of its Mumbai office earlier this year.

An official statement said, "Delivered in partnership with the British Council, the three-day programme was led by coaches from the Premier League, Brentford and Newcastle United, who provided expert training to 30 community coaches, helping expand access to football across India."

"The activity culminated in a showcase event at the Cooperage Football Ground in Mumbai. The community coaches put the skills they have learned into practice with 80 children from the Oscar Foundation, highlighting how the programme empowers local leaders to inspire the next generation through football," it said.

According to the statement, among the special guests in attendance were UK Prime Minister Sir Keir Starmer and Premier League legend Michael Owen, who interacted with the coaches and the young players.

Starmer said: "I'm hugely proud of our national sport – it brings communities together and changes lives. That's why the Premier League's training programme in India is so impressive – not only is it one of our most successful exports, but it's training the game's future coaches, inspiring young people, and showing the world what British sport can do."

Former Liverpool, Manchester United, and Newcastle United striker Owen said, "Witnessing the passion for football in India this week has been incredible and I'm sure it can only grow in the future."

"I had a wonderful time speaking to the coaches and young players, and I am excited to see their journey in the game," added Owen.

The community coaches involved in the programme travelled from across India to take part, having all played a key role in the League's community efforts in the country to date.

For nearly two decades, the partnership between the Premier League and the British Council has helped upskill more than 41,000 football coaches, referees, and educators, benefiting over 2.2 million young people across 29 countries. In India, it has delivered training in 18 states, supporting more than 7,500 coaches, referees, and educators, and benefitting over 164,000 young people.

# Smriti Mandhana Creates History; Breaks 28-Year-Old World Record



**Hyderabad :** India opener Smriti Mandhana entered the Women's World Cup 2025 on the back of brilliant form. However, the left-handed batter has suffered poor form in the tournament, and it continued in the match played against South Africa at the Dr Y.S. Rajasekhara Reddy ACA-VDCA Cricket Stadium in Visakhapatnam on Thursday as well. Although the tournament has turned out to be a forgettable one for Mandhana with just 54 runs from three matches, she etched her name in the record books, breaking a 28-year-old world record.

**Mandhana shatters 28-year-old record**

Mandhan's record came during her 55-run opening partnership with Pratika Rawal. During her short stay at the crease, the 29-year-old broke the record of Australian cricket legend Belinda Clark, which was set in 1997. She became the batter with the most runs in a calendar year in women's cricket.

The Indian cricketer has amassed 982 runs from 17 innings with an average of 57.76, laced with four centuries. With at least five matches to go in the tournament, Mandana is likely to cross the tally of 1000 runs in a calendar year.

Also, her tally of four centuries is the joint-second most in a calendar year, only behind South Africa's Tazmin Britz.

**Richa Ghosh registers the highest score by an Indian wicketkeeper**

The Indian wicketkeeper-batter not only steadied the innings with her carnage but also helped them post a decent total. When Richa walked in to bat, India were reeling at 102/6, but she took them to 251/9 during her stay at the crease. During her knock of 94 runs from 77 deliveries, Richa broke multiple records.

She clocked the highest score by an Indian wicketkeeper in a Women's World Cup. Also, she registered the highest score by a batter at No. 8 or lower in ODIs.

94 - Richa Ghosh (IND-W) vs SA-W, Vizag, 2025 WC

84 - Nadine de Klerk (SA-W) vs IND-W, Vizag, 2025 WC

74 - Chloe Tryon (SA-W) v SL-W, Colombo, 2025

69 - Fatima Sana (PAK-W) v SA-W, Karachi, 2023

# उर्दू साहित्य कला अकादमीचा सुवर्णमहोत्सवी तीन दिवसीय समारोह संपन्न

## दर्जेदार साहित्यिक, सांगितीक, सांस्कृतिक कार्यक्रमांनी सोहळ्यास रंगत

● मुंबई, विशाल पाटील :



महाराष्ट्र उर्दू साहित्य अकादमीला ५० वर्षे पूर्ण झाली. या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वरळी डोम येथे ६ ते ८ ऑक्टोबर रोजी तीन दिवसीय साहित्यिक व सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यानिमित्त पुस्तक प्रदर्शन, कवी संमेलन, पत्रकार, कवी, लेखक यांना पुरस्कार प्रदान, सुफी संगीत अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**अद्ययावत उर्दू घर उभारणार – अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री ॲड माणिकराव कोकाटे**

या सोहळ्याचे उद्घाटन अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते झाले. उद्घाटन प्रसंगी ते म्हणाले की, मराठी व उर्दू साहित्यिक देवाण घेवाणीसाठी सांस्कृतिक केंद्रे म्हणजे 'उर्दू घर योजना' आहे. ही योजना अद्ययावत बनविण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील. तसेच उर्दू शाळा, वसतिगृहे वाढविण्यासाठी सकारात्मक निर्णय घेणार असल्याची माहिती अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिली. उर्दू साहित्य अकादमीची नवीन समिती लवकरच गठित करणार आल्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली.

मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान विभूतींनी समाजउन्नतीसाठी कार्य करताना सर्वसमावेशकता, शिक्षण, भाषेचा विकास आणि संस्कृती संवर्धन यासारख्या मूल्यांची परंपरा निर्माण केली. त्यांच्या विचारांच्या प्रभावामुळेच उर्दूसह सर्व भाषांना महाराष्ट्रात मानाचे स्थान लाभले. या आदर्शांच्या प्रेरणेनेच आज उर्दू भाषेचा सुवर्ण महोत्सवी प्रवासाचा सोहळा संपन्न होत आहे. उर्दू ही फक्त भाषा नाही, ती संस्कृतीचा सुगंध, विचारांचा सेतू आणि आत्म्याचा आवाज आहे.

मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे म्हणाले की, ४५० पेक्षा जास्त साहित्य कार्यक्रम, २५० हून अधिक कवी संमेलने, १५० पेक्षा जास्त कार्यशाळा आणि १०० हून अधिक पुस्तक प्रकाशनांनी उर्दू साहित्याची परंपरा समृद्ध केली आहे. २५ पेक्षा अधिक जिल्ह्यांत अकादमीने कार्यक्रम घेत ग्रामीण भागातील उर्दूप्रेमींपर्यंत साहित्य पोहोचवले आहे. उर्दू ही भारतीय भाषा असून सुमारे सात कोटी लोक ती प्रथम भाषा म्हणून आणि १० कोटी लोक द्वितीय भाषा म्हणून वापरतात. महाराष्ट्रात सात टक्के लोक उर्दू बोलतात, तसेच जवळपास २५ पेक्षा अधिक उर्दू दैनिके कार्यरत आहेत.

उर्दू घर योजनेंतर्गत नांदेड, मालेगाव, जळगाव, सोलापूर, नागपूरमध्ये 'उर्दू घर' उभारणी सुरू आहे. महाराष्ट्रातील १८०० उर्दू शाळात नऊ लाख विद्यार्थांना उर्दू शिकविले जाते. 'उर्दू लर्निंग ॲप' द्वारे दरवर्षी ५०,००० विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण दिले जाते. तीन वर्षांत १०० जिल्हास्तरीय साहित्य संमेलने घेतली गेली.

अल्पसंख्याक महिला व युवकांना प्रशिक्षण, शैक्षणिक प्रोत्साहन देणे अशा अनेक योजना अल्पसंख्याक विभागाच्या माध्यमातून सुरु आहेत. उर्दू साहित्य अकादमीसह एकूणच अल्पसंख्याक विभागाच्या विविध योजनांसाठी अतिरिक्त विकास निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे मंत्री ॲड. कोकाटे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी माजी मंत्री नवाब मलिक, माजी मंत्री अनिज अहमद, आमदार सना मलिक, माजी आमदार ईशान सिद्दिकी, पंजाबी साहित्य अकादमीचे अध्यक्ष मार्क सिंह, 'औकाफ बोर्ड'चे अध्यक्ष समीर काझी, पटकथा लेखक जावेद अख्तर, विभागाचे सचिव रुचेश जयवंशी, आयुक्त प्रतिभा इंगळे, सचिन पिळगावकर, रुमी जाफरी, शेखर सुमन, नईम एजाझ, सरफराज आरजू यांच्यासह अधिकारी, कलाकार आणि साहित्यिक उपस्थित होते. यावेळी उर्दू सिके आणि मराठी शिकूया अशा दोन पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले.

**उर्दू साहित्य कला अकादमीच्या सुवर्णमहोत्सवाचा सोहळा**

सचिव रुचेश जयवंशी म्हणाले की, मराठी साहित्याचे उर्दू भाषेत आणि उर्दू साहित्याचे मराठी भाषेत भाषांतर करून मराठी व उर्दू भाषेतील सृजनशीलता वाढविण्याच्या उद्देशाने माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी १९७५ मध्ये या अकादमीची स्थापना केली. दोन्ही संस्कृतीची आणि साहित्याची देवाण घेवाण करणे तसेच उर्दू साहित्याचे जतन, संवर्धन करण्यासाठी उर्दू साहित्य कला अकादमी कार्यरत आहे. नाट्यमहोत्सव, पुस्तके, पत्रकार, ग्रंथालय , लेखक, कवी, यांना प्रोत्साहन देणे हा उद्देश अकादमीचा आहे.

गत चार वर्षातील २०० लेखक, कवी आणि ४८ पुस्तकांच्या लेखकाना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये नवोदित साहित्यिकांना पुरस्कार, नवोदित लेखकाना पुरस्कार, पत्रकारांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

नवोदित कवींचे कवी संमेलन, उर्दू नाटक, वाली दाकनी अवॉर्ड, मिर्झा गालिब अवॉर्ड, महाराष्ट्र मे उर्दू अदब, मॉर्डन टेक्नॉलॉजी अँड उर्दू अशा विविध साहित्यिक कार्यक्रमांनी सोहळ्याची रंगत वाढली होती.

# पुण्यातील एनडीए मध्ये विद्यार्थ्याची गळफास घेऊन आत्महत्या

● पुणे, अभिजित येरल्लू :



पुणे शहरातील खडकवासला भागात असलेल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए)मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. अंतरिक्ष कुमार (वय १८; राहणार- मूळ उत्तर प्रदेश) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंतरिक्ष कुमार हा विद्यार्थी मूळचा उत्तर प्रदेशातील लखनौ येथील असून, त्याचे वडील माजी सैनिक आहेत. तर अंतरिक्षने जुलै महिन्यात पहिल्या सत्राकरिता प्रवेश घेतला होता.

आज पहाटेच्या सुमारास अंतरिक्ष कुमारने त्याच्या खोलीमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. या आत्महत्येच्या घटनेमागील कोणतेही कारण अद्यापपर्यंत समजू शकले नसल्याचे उत्तमनगर पोलिसांनी सांगितले.

# महसूल गुप्तचर संचालनालयाच्या अधिकाऱ्याची मनमानी कृती; हायकोर्टाने कडक शब्दांत ओढले ताशेरे

● मुंबई, विशाल कारंडे :

सीमाशुल्क विभागाने आधी मंजुरी दिलेल्या सुक्या खजुरांचा माल परत मागवण्याची बेकायदेशीर कृती केल्याबद्दल उच्च न्यायालयाने महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) वरिष्ठ अधिकाऱ्यावर कडक शब्दांत ताशेरे ओढले. अधिकाऱ्याची कृती मनमानी स्वरुपाची तसेच कायद्याला धरून नाही. कायदेशीर अधिकार नसताना अधिकाऱ्याने ही कृती केली आहे, असे ताशेरे न्यायमूर्ती एम. एस. सोनक आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने ओढले. मुंबईतील आयातदार कंपनी मेक इंडिया इम्पेक्सने दाखल केलेल्या याचिकेची खंडपीठाने गंभीर दखल घेतली आणि डीआरआयच्या कारभारावर संताप व्यक्त केला.

डीआरआयचे वरिष्ठ गुप्तचर अधिकारी सुमित कटारिया यांनी सुक्या खजुरांचा माल परत मागवण्याबाबत अधिकारांचा गैरवापर केल्याचे निदर्शनास आले आहे. सीमाशुल्क विभागाने मंजुरी दिलेला माल परत मागवण्याकामी त्यांनी मनमानी आणि कायदेशीर अधिकाराशिवाय काम केल्याचा आरोप आहे. तब्बल ५६ टन सुक्या खजुरांचा माल २४ जुलै २०२५ रोजी सीमाशुल्क विभागाने योग्य पडताळणी आणि ६.३ लाख रुपये किमतींची कस्टम ड्युटी भरल्यानंतर मंजूर करण्यात आला होता. न्हावा शेवा येथील जे. एम. बक्सी कंटेनर फ्रेट स्टेशनमधून (सीएफएस) संबंधित माल सोडण्यात आला आणि नंतर नवी मुंबईतील गोदामात नेण्यात आला. मात्र त्याच संध्याकाळी कटारिया यांनी कस्टम ब्रोकर आणि ट्रान्सपोर्टरला फोन करून माल परत सीएफएसमध्ये आणण्यासाठी तगादा लावला. कायदेशीररीत्या कार्यवाही करूनही कटारिया यांनी कठोर कारवाईची धमकी देत माल जबरदस्तीने परत मागवला. तेव्हापासून कंटेनर सीएफएसमध्येच ठेवण्यात आला आहे, याकडे याचिकाकर्त्या मेक इंडिया इम्पेक्सने उच्च न्यायालयाचे लक्ष वेधले. त्याची गंभीर दखल न्यायमूर्ती एम. एस. सोनक यांच्या खंडपीठाने घेतली आणि डीआरआयचे वरिष्ठ गुप्तचर अधिकारी सुमित कटारिया यांच्या कृतीवर कठोर शब्दांत ताशेरे ओढले.

**कारणे दाखवा नोटीस जारी करण्याचे निर्देश!**

वैधानिक अधिकाऱ्यांनी कायद्यानुसार अधिकाराचा वापर करताना घालून दिलेल्या मर्यादेत काम करणे आवश्यक आहे, असे खंडपीठाने यावेळी सुनावले. तसेच कस्टम अधिकाऱ्यांना चार आठवड्यांत कारणे दाखवा नोटीस जारी करण्याचे आणि याचिकाकर्त्या कंपनीचा प्रतिसाद मिळाल्यापासून सहा आठवड्यांत ती निकाली काढण्याचे निर्देश दिले.

# पांझरा- कान साखर कारखान्यामुळे होणार रोजगारात वाढ : मंत्री दादाजी भुसे

● धुळे, सचिन कदम :




साक्री तालुक्यासह परिसरासाठी महत्वपूर्ण असलेल्या पांझरा- कान सहकारी साखर कारखाना कार्यान्वित झाल्यावर कारखान्याच्या माध्यमातून रोजगाराच्या क्षमतेत वाढ होईल, असा विश्वास शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज व्यक्त केला.

मंत्री श्री. भुसे यांच्या उपस्थितीत आज सकाळी पांझरा- कान सहकारी साखर कारखाना नूतनीकरण शुभारंभ कार्यक्रम आणि शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार मंजुळाताई गावित, भाडणेचे सरपंच अजय सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. तुळशीराम गावित, बबनराव गायकवाड, साखर कारखाना समितीचे सदस्य उपस्थित होते.

मंत्री श्री. भुसे म्हणाले की, साक्री तालुक्यात सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच शेतकऱ्यांना आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल. गेल्या महिन्यात राज्यातील बहुतांश जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. त्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या शेतकऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने दिलासा दिला आहे. त्यासाठी ३१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे. राज्य शासनाने निकषांपेक्षा जास्त दराने मदत केली असून भरपाईची रक्कम संबंधित पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात दिवाळीपूर्वी जमा करण्यात येईल, असे नियोजन करण्यात आले आहे.

आमदार श्रीमती गावित यांनी सांगितले की, गेल्या २५ वर्षांपासून बंद असलेला पांझरा- कान साखर कारखाना आता सुरू होत आहे. ही समाधानाची बाब आहे. कारखाना सुरू करण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. श्री. गायकवाड, प्रा. नरेंद्र तोरवणे आदींनी मनोगत व्यक्त केले. सरपंच श्री. सोनवणे यांनी प्रास्ताविक करून आभार मानले. यावेळी परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर वृक्षरोपणाचा कार्यक्रम पार पडला.

# आदर्श संस्थेतर्फे 'आदर्श ग्रंथ पुरस्कार' जाहीर; कादंबरीकारांना सहभागाचे आवाहन

● ठाणे, रोहित जैसवार :



महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरील दर्जेदार कादंबरी लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी बदलापुरातील आदर्श विद्या प्रसारक संस्थेतर्फे यंदापासून "आदर्श ग्रंथ पुरस्कार" सुरू करण्यात आला आहे. हा पुरस्कार कादंबरी या साहित्यप्रकारासाठी देण्यात येणार असून, निवड झालेल्या लेखकाला ५ हजार रोख, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि शाल देऊन सन्मानित करण्यात येईल.या उपक्रमाचे आयोजन आदर्श कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातर्फे करण्यात आले आहे. या माध्यमातून राज्यातील आणि राज्याबाहेरील कादंबरीकारांनी आपले साहित्य अधिक व्यापक स्तरावर पोहोचवावे आणि गुणवत्तापूर्ण लेखनाला प्रोत्साहन मिळावे हा उद्देश संस्थेचा आहे.

पुरस्कारासाठी पात्र ठरणाऱ्या कादंबऱ्या १ जानेवारी २०१९ ते ३१ मे २०२५ या कालावधीत प्रथमच प्रकाशित झालेल्या असाव्यात. इच्छुक लेखकांनी आपल्या कादंबरीच्या तीन प्रती ग्रंथपाल, आदर्श कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कुळगाव – बदलापूर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे, पिन – ४२१५०३ पत्त्यावर २० डिसेंबर २०२६ पर्यंत पाठवाव्यात असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.या पुरस्कारासाठी आलेल्या कादंबऱ्यांचे परीक्षण महाराष्ट्रातील प्रसिद्ध कादंबरीकार किंवा समीक्षक यांच्या मार्फत केले जाणार आहे. परीक्षणानंतर ११ जानेवारी २०२६ रोजी ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त वि. स. खांडेकर यांच्या जयंती दिनी विजेत्या कादंबरीची घोषणा करण्यात येईल. यानंतर मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त २७ फेब्रुवारी २०२६ रोजी आदर्श महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात सुप्रसिद्ध साहित्यिक आणि मान्यवरांच्या हस्ते आदर्श ग्रंथ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

# शेतकऱ्यांना योग्य आणि वेळेत विमा रक्कम मिळण्यासाठी प्रयत्न करावेत - पालकमंत्री मेघना बोर्डीकर

**परभणी जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्तीचा अनुदान वाटप व निधी मागणीचा घेतला आढावा**

● परभणी, नितीन देवळेकर :




शेतकऱ्यांना पिकविम्याची योग्य आणि वेळेत नुकसान भरपाई मिळण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि पिकविमा कंपनीने समन्वयाने कामे करावे. ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे त्या ठिकाणी पिक कापणीचे प्रयोग होतील याचे नियोजन करावे. सर्व महसूल, कृषी, ग्रामविकास आणि विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी समन्वयाने शेतकऱ्यांना जास्तीत जास्त विमा नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी काम करण्याचे निर्देश पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात परभणी जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटप व निधी मागणी आयोजित आढावा बैठकीत पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर बोलत होत्या. बैठकीस जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर, संगीता चव्हाण, उदयसिंह भोसले, सर्व तहसिलदार आदींसह महसूल, कृषि, ग्रामविकास विभागाचे अधिकारी तसेच विमा कंपनीचे अधिकारी /प्रतिनिधी उपस्थित होते.

श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत मिळवून देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. तसेच जिल्ह्याला अतिवृष्टी नुकसानीची मिळालेली रक्कम दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले. मागील वर्षी शेतकऱ्यांना पिक विमा कंपनीच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात त्रास झाला. यावेळेस एकही तक्रार शेतकऱ्यांची येणार नाही याची काळजी विमा कंपनीने घ्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच नदीकाठच्या गावातील शेतातील विहिरीमध्ये साचलेल्या गाळाच्या बाबतही पंचनामे करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या.

प्रारंभी जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी सादरीकरणाव्दारे जिल्ह्यातील ऑगस्ट महिन्यातील अतिवृष्टी व पुरामुळे झालेले नुकसानीच्या अनुदान वाटपाबाबतची माहिती आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या पंचनामे आणि निधी मागणीच्या बाबत करण्यात आलेली कार्यवाही याबाबतची सविस्तर माहिती दिली.

श्री. चव्हाण म्हणाले की, ऑगस्ट महिन्यात नुकसानीपोटी मिळालेले अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. तसेच माहे सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदतीची रक्कम खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरू असून ज्या शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नाही त्या शेतकऱ्यांच्या ई-केवासीसाठी सेतु सुविधा केंद्र सकाळी आणि सायंकाळी जास्त वेळ चालू ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.